। लातूर । वर्ष ३५ वे । अंक २५ वा । बुधवार, दिनांक ०८ एप्रिल २०२६ । पृष्ठे ६ । किंमत १ रू.
RNI 47034/64

# लातूर समाचार

LATUR SAMACHAR
(सांज दैनिक)
प्रकाशन: लातूर
Email-dainiklatursamachar@gmail.com
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26
संस्थापक : स्व.शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक) कार्यकारी संपादक : शिवाजी दयानंद जडे

# अमेरिका-इराण युद्ध थांबले

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** इराण आणि अमेरिका यांच्यातील युद्ध अखेर बुधवारी थांबलं आहे. अमेरिका आणि इराण या दोन्ही देशांमधला संघर्ष अखेर थांबला असून दोन्ही देशांमध्ये शस्त्रसंधी झाली आहे. दोन्ही देशांनी सैन्य कारवाया दोन आठवड्यांसाठी थांबवण्याचा निर्णय घेतला आहे.

राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी शस्त्रसंधीची घोषणा केल्यानंतर इराणचे परराष्ट्र मंत्री, सय्यद अब्बास अराघची यांनी देखील एक्सवर पोस्ट करुन वृत्ताला दुजोरा दिला आहे. इस्लामिक रिपब्लिक ऑफ इराणच्या सर्वोच्च राष्ट्रीय सुरक्षा परिषदेच्या वतीने निवेदन जारी करत अराघची यांनी दोन आठवड्यांसाठी शस्त्रसंधी करण्यात आल्याचे मान्य केले आहे.

अमेरिका आणि इराण यांच्यातील युद्ध थांबवण्यात चीन आणि पाकिस्तानने मध्यस्थी केल्याचं बोललं जात आहे. तसेच इराणने पाकिस्तानमार्फत अमेरिकेकडे एक सविस्तर प्रस्ताव पाठवला आहे. जो आता अमेरिकन बाजू वाटाघाटीसाठी पुढे करणार आहेत. सध्या अमेरिका आणि इराण यांच्यात दोन आठवड्यांसाठी शस्त्रसंधी झाली असून १० एप्रिल रोजी पाकिस्तानच्या इस्लामाबादमध्ये इराण आणि अमेरिका यांच्यात चर्चा सुरु होईल. इराण आणि अमेरिका यांच्यात शस्त्रसंधी झाल्यानंतर आता भारताकडून पहिली प्रतिक्रिया आली आहे. भारतीय परराष्ट्र मंत्रालयाकडून



अमेरिका-इराण शस्त्रसंधीचे स्वागत करण्यात आले आहे.

अमेरिका-इराण शस्त्रसंधीचे भारताकडून स्वागत करण्यात आले आहे. शस्त्रसंधीमुळे आखातात आता शांतता राहील, असे भारतीय परराष्ट्र मंत्रालयाकडून स्पष्ट करण्यात आलं आहे. तसेच होर्मुझमधली वाहतूक पूर्ववत होईल अशी आशा आहे. आधीच युद्धामुळे खूप नुकसान झालंय. युद्धामुळे जगावर इंधनाचे संकट आले, असे भारताने म्हटले आहे. चर्चा आणि कूटनीतीनेच समस्यांवर तोडगा शक्य आहे, असेही भारताने म्हटले आहे.

**डोनाल्ड ट्रम्प यांनी मानले पाकिस्तानचे आभार**

ट्रम्प यांनी सोशल मीडिया पोस्टमध्ये म्हटले आहे, मी दोन आठवड्यांच्या कालावधीसाठी इराणवरील बॉम्बहल्ले आणि हल्ले थांबवण्यास सहमत आहे. हा द्विपक्षीय युद्धविराम असेल. पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ आणि फील्ड मार्शल आसिम मुनीर यांच्याशी झालेल्या माझ्या चर्चेनुसार आणि त्यांच्या विनंतीनुसार, मी आज रात्री इराणकडे पाठवण्यात येणारी विनाशकारी लष्करी शक्ती थांबवत आहे, परंतु अट अशी आहे की इराणने होर्मुझची सामुद्रधुनी पूर्णपणे, तात्काळ आणि सुरक्षितपणे उघडण्यास सहमती दर्शवावी. हे करण्यामागचे कारण असे आहे की, आम्ही सर्व लष्करी उद्दिष्टे आधीच पूर्ण केली आहेत आणि त्याहूनही पुढे गेलो आहोत, आणि आम्ही इराणसोबत दीर्घकालीन शांततेसाठी आणि मध्य-पूर्वेतील शांततेसाठी एका ठोस कराराच्या अगदी जवळ आहोत. मला इराणकडून १०-कलमी प्रस्ताव मिळाला आहे, आणि आमचा विश्वास आहे की वाटाघाटींसाठी हा एक व्यवहार्य आधार आहे.

## लातूर जिल्ह्यात ८ ते १४ एप्रिल दरम्यान भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताह

समाज कल्याण प्रादेशिक उपायुक्त, सहायक आयुक्त यांची पत्रकार परिषदेत माहिती



**लातूर/प्रतिनिधी :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंती निमित्त लातूर जिल्ह्यात ८ एप्रिल ते १४ एप्रिल २०२६ या कालावधीत 'भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताह' साजरा करण्यात येणार आहे. या सप्ताहाच्या माध्यमातून सामाजिक न्याय विभागाच्या विविध योजनांचा प्रसार आणि महामानवांच्या विचारांचा जागर केला जाईल, अशी माहिती समाज कल्याण विभागाचे प्रादेशिक उपायुक्त अविनाश देवसटवार आणि सहायक आयुक्त यादव गायकवाड यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे आयोजित पत्रकार परिषदेत दिली. प्रारंभी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताहाचे उद्घाटन ८ एप्रिल रोजी करण्यात आले. तसेच सर्व तालुक्यांच्या गटविकास अधिकाऱ्यांमार्फत भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे वाटप करण्याची कार्यवाही आजपासून सुरु झाली आहे. महाड येथील चवदार तळे सत्याग्रहाचे हे शताब्दी वर्ष असल्याने ९ एप्रिल रोजी लातूर जिल्ह्यातील सर्व महाविद्यालय, आश्रमशाळा, शासकीय वसतिगृह, निवासी शाळा येथे मानवी हक्कांवर आधारित व्याख्याने, निबंध आणि वक्तृत्व स्पर्धांचे आयोजन केले जाणार आहे. यासोबतच संत गाडगे महाराज यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त त्यांच्या कार्यावर आधारित विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. १० एप्रिल रोजी समतादूतांच्या माध्यमातून ग्रामीण व शहरी भागात पथनाट्यांद्वारे शासकीय योजनांविषयी जनजागृती केली जाईल. तसेच 'मार्जिन मनी' योजनेच्या लाभार्थ्यांसाठी विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात येणार असल्याचे सहायक आयुक्त श्री. गायकवाड यांनी सांगितले.

महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीचे हे द्विशताब्दी वर्ष असल्याने त्यांच्या सामाजिक कार्यावर आधारित विशेष कार्यक्रमांचे शासकीय वसतिगृहे व निवासी शाळांमध्ये ११ एप्रिल रोजी आयोजन करण्यात येईल. १२ एप्रिल रोजी 'संविधान जागर' अंतर्गत संविधानातील मूलभूत अधिकार व कर्तव्यांविषयी विशेष व्याख्याने आयोजित करण्यात आली आहेत. तसेच महिला मेळाव्याच्या माध्यमातून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी महिलांसाठी केलेल्या कार्याचा माहिती दिली जयाल. १३ एप्रिल रोजी ज्येष्ठ नागरिकांसाठी जनजागृती शिबीर व मेळावा आयोजित करण्यात येईल. तसेच जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांच्या सहकार्याने रक्तदान शिबिरांचे आयोजन करण्यात येणार असल्याचे श्री. गायकवाड म्हणाले.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त १४ एप्रिल रोजी अभिवादन कार्यक्रम, चर्चासत्रे आणि कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभिमान मेळावा आयोजित करून शेतकऱ्यांसाठी बाबासाहेबांनी केलेल्या कार्याची माहिती दिली जाईल. या सप्ताहादरम्यान विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचा लाभ प्रातिनिधिक स्वरूपात लाभार्थ्यांना वाटप करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील सर्व नागरिक, विद्यार्थी आणि लाभार्थ्यांनी या विविध उपक्रमांमध्ये मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन समाज कल्याण प्रादेशिक उपायुक्त अविनाश देवसटवार आणि सहायक आयुक्त यादव गायकवाड यांनी केले.

रोज वाचा
ऑनलाईन
लातूर समाचार
www.latursamachar.com

## प्रभात किरणे

सकरत्मक विचार,द्रड
आत्मविश्वास मनी असे
जिद्द,देई आत्मबळ
मनास नाथा नागनाथा,
नको करू रे आळस
प्रयत्न करी,करिता,
उभे दिसे पुढे यश
-इंजि. नागनाथ कलवले
लातूर
९१-९७६४७ ८८२८८

## मांजरा कारखान्यात ८ टीपीडी सीबीजी प्रकल्पाचा शुभारंभ

➤ सी बी जी प्रकल्पामुळे कारखान्याचे आधूनिकिकरणाकडे भक्कम पाऊल

➤ माजी मंत्री चेअरमन दिलीपराव देशमुख यांचे प्रतिपादन

**लातूर/प्रतिनिधी :** राज्यातील सहकार क्षेत्रांत नावलौकिक असलेल्या विकासरत्न विलासराव देशमुख मांजरा सहकारी साखर कारखान्यात ८ टीपीडी क्षमतेच्या म्हणजे आठ मॅट्रिक टन प्रति दिवस कॉम्प्रेस्ड बायोगॅस (उइऋ) प्रकल्पाचा शुभारंभ राज्याचे माजी मंत्री तथा कारखान्याचे चेअरमन सहकार महर्षी दिलीपराव देशमुख यांच्या हस्ते व अन्य मान्यवरांच्या उपस्थितीत मंगळवारी सायंकाळी उत्साहात पार पडला. मांजरा कारखान्यातून आता दररोज आठ मॅट्रिक टन कॉम्प्रेस्ड बायोगॅस (उइऋ) निर्मिती होणार आहे.

१०० टक्के ऊस हार्वेस्टरद्वारे तोडणी करून देशासमोर आदर्श निर्माण केला यावेळी बोलताना दिलीपराव देशमुख म्हणाले की, मांजरा कारखान्याने नेहमीच शेतकरी हिताला प्राधान्य दिले आहे. ऊसतोडणीचे १०० टक्के हार्वेस्टरद्वारे नियोजन करून कारखान्याने देशासमोर आदर्श निर्माण केला आहे. लोकनेते विलासराव देशमुख यांनी दिलेल्या विचारधारेचा मार्गदर्शक ठेऊन मांजरा परिवाराची वाटचाल सुरू आहे. सीबीजी प्रकल्पामुळे कारखान्याने आधुनिकीकरणाच्या दिशेने एक भक्कम पाऊल टाकले असून, कामाच्या



माध्यमातून विश्वास निर्माण करण्याचे कार्य आम्ही सातत्याने करत आहोत, असे सांगून भविष्यात अधिकपणे चांगल काम करण्याचा आमचा प्रयत्न राहणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी कारखान्याचे व्हाईस चेअरमन अशोकराव काळे यांनी प्रास्ताविकात चालू गळीत हंगामाची सविस्तर माहिती दिली. कार्यक्रमात लातूर शहर व तालुक्यातील स्थानीक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकित विजयी झालेल्या सर्व पदाधिकाऱ्यांचा त्यात लातूर शहराच्या नूतन महापौर, स्थायी समितीचे सभापती, नगरसेवक तसेच जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्यांचा कारखान्याच्या वतीने सत्कार करण्यात आला.

यावेळी महापौर सौ. जयश्री सोनकांबळे, रेणाचे अनंतराव ठाकूर-देशमुख मारुती महाराज साखर कारखान्याचे अध्यक्ष शाम भोसले,कोंग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष अँड किरण जाधव किरण जाधव,सचिन बंडापल्ले (मनपा लातूर स्थाईसमिती सभापती), बाळासाहेब कदम (अध्यक्ष, इंदिरा सूत गिरणी), प्रमोद जाधव (व्हाईस चेअरमन, लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक), सचिन पाटील (उपाध्यक्ष, संत शिरोमारुती महाराज कारखाना), अॅड. प्रविण पाटील (उपाध्यक्ष, रेणा कारखाना) श्रीकांत बैले(पंचायत समिती सभापती),महेश चव्हाण(उपसभापती) अनिलराज पिसे (राज प्रोसेसचे एमडी), अमर वडगावकर, रिजवान अन्सारी, मयूर निळकंठ, रोहित गव्हाणे, जिल्हा परिषद सदस्य दत्तात्रय टेकाळे, श्रीकांत माने, महादेव मस्के, अश्विनी शिंदे, दिपाली आदमाने, राजश्री देशमुख, भागीरथी पाटील, पंचायत समिती सदस्य गुरुनाथ गवळी, अमोल देडे, अक्षय देशमुख, सत्यनारायण पाटील, विलास उफाडे, किशोर जवंजाळे, शरयू गायकवाड, दिपाली कराड, सुनंदा स्वामी पूजा ढगे, तनुजा चव्हाण, प्रिया उफाडे, पूजा जाधव, शिवानी शिंदे आदींसह कारखान्याचे संचालक, कार्यकारी संचालक पंडीत देसाई,कारखान्याचे खाते प्रमुख, अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सचिन सुर्यवंशी यांनी केले तर आभार कैलास पाटील यांनी मानले.

## लातूर जिल्ह्यात आधारभूत किंमत खरेदी योजनेअंतर्गत चना खरेदीसाठी शेतकरी नोंदणीस १५ एप्रिलपर्यंत मुदतवाढ

**लातूर/प्रतिनिधी :** हंगाम २०२५-२६ मध्ये केंद्र शासनाने निश्चित केलेल्या आधारभूत दरानुसार लातूर जिल्ह्यात नाफेडच्या वतीने सुरू असलेल्या चना खरेदीसाठी शेतकरी नोंदणी प्रक्रियेला आता १५ एप्रिल २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. राज्य शासनाने शेतकऱ्यांचा सकारात्मक प्रतिसाद लक्षात घेऊन हा निर्णय घेतला असल्याची माहिती जिल्हा पणन अधिकारी एम. व्ही. वाजपेयी यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.

लातूर जिल्ह्यात चना खरेदीसाठी शेतकरी नोंदणी प्रक्रिया १ मार्च २०२६ पासून सुरू करण्यात आली होती. यापूर्वी नोंदणीची अंतिम तारीख ३१ मार्च २०२६ पर्यंत निश्चित करण्यात आली होती. मात्र, जास्तीत जास्त शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ घेता यावा, यासाठी शासनाने ऑनलाईन नोंदणीचा कालावधी वाढवून आता १५ एप्रिल २०२६ पर्यंत केला आहे. शासनाने दिलेल्या विहित कालावधीतच नोंदणी प्रक्रिया पूर्ण करण्यात यावी. ही नोंदणी प्रक्रिया पूर्णतः ऑनलाईन असून, कोणत्याही परिस्थितीत ऑफलाईन अर्ज स्वीकारले जाणार नाहीत. लातूर जिल्ह्यातील ज्या शेतकऱ्यांनी अद्याप आपली नोंदणी केलेली नाही, त्यांनी वाढीव मुदतीचा लाभ घेऊन त्वरित ऑनलाईन नोंदणी पूर्ण करावी, असे आवाहन जिल्हा पणन कार्यालयामार्फत करण्यात आले आहे.

## कुजबुज

-डॉ. संजय जमदाडे



माहिती तंत्रज्ञान आयुक्तालय स्थापन करणार - मुख्यमंत्री

## चिमटा



दयाचा
तरूणवर्ग बेभान
गाड्या चालवत आहेत !
अपघात वाढले
आहेत !!
पोलीसांनी वेळीच
लगमा लावला
तरच शिस्त दिसून
येणार आहे !!!

# स्थानिक गुन्हे शाखेची मोठी कारवाई; प्रतिबंधित सुगंधी तंबाखूचा ३.७५ लाखांचा साठा जप्त, एकास केले जेरबंद

**लातूर/प्रतिनिधी :** जिल्ह्यात अवैध धंद्यांवर प्रभावी नियंत्रण आणण्यासाठी लातूर पोलीस दलाकडून सातत्याने कठोर व नियोजनबद्ध कारवाया सुरू असून, त्याच अनुषंगाने आज दिनांक ०७ एप्रिल २०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखा, लातूर यांनी चाकूर येथे मोठी धाड टाकून महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेल्या सुगंधी तंबाखूचा मोठा साठा जप्त केला आहे. सदर कारवाई पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्या आदेशान्वये व अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांच्या नियंत्रणाखाली ही मोहीम प्रभावीपणे राबविण्यात आली.

या कारवाईत स्थानिक गुन्हे शाखेचे पथकामधील पोलीस उपनिरीक्षक प्रमोद नानासाहेब देशमुख,पोलीस अंमलदार संजय कांबळे, सूर्यकांत कलमे, पाराजी पुठ्ठेवाड, तुळशीराम बरुरे, प्रदीप चोपणे यांचा समावेश होता. तसेच कारवाईदरम्यान पोलीस स्टेशन चाकूर येथील बीट अंमलदार बोळंगे यांनी सहकार्य केले.

सदर पथकाने स्वामी विवेकानंद चौक परिसरातील राज कन्फेक्शनरी दुकानाच्या पाठीमागील गोडाऊनमध्ये महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेला सुगंधी तंबाखू साठवून विक्रीसाठी ठेवलेल्या ठिकाणी धाड टाकून मारुती (वय ३३ वर्षे, रा. चाकूर) यास ताब्यात घेतले.गोडाऊनची झडती घेतली असता झडतीदरम्यान मोठ्या प्रमाणात महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेला सुगंधी तंबाखूचा साठा आढळून आला. त्यामध्ये- NO.4101 Premium Chewing Tobacco नावाची १६ पोती, सुगंधी तंबाखूची ०६ पोती, Extra Freshness नावाची ०३ पोती, असा एकूण ३,७५,०००/- (तीन लाख पंच्याहत्तर हजार रुपये) किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

सदर प्रतिबंधित तंबाखू हा सार्वजनिक आरोग्यास गंभीर धोका निर्माण करणारा असून, महाराष्ट्र शासनाने त्यावर बंदी घातलेली आहे. तरीदेखील आरोपीने स्वतः च्या दुकानाच्या गोडाऊनमध्ये हा साठा बेकायदेशीररित्या विक्रीसाठी ठेवलेला आढळून आला. सदर मुद्देमाल पंचांच्या समक्ष जप्त करण्यात आला असून,या प्रकरणी आरोपी मारुती राजेंद्र सोमवंशी याच्या विरोधात भारतीय न्याय संहिता (BNS) कलम १२३, २७४, २७५, २२३ तसेच अन्न सुरक्षा व मानके अधिनियम कलम ५९ अन्वये पोलीस ठाणे चाकूर येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

प्रतिबंधित तंबाखूजन्य पदार्थांचे उत्पादन, साठवणूक व विक्री करणे हा गंभीर गुन्हा असून, अशा प्रकारच्या अवैध कृत्यांविरुद्ध भविष्यातही कठोर कारवाई करण्यात येणार आहे.



ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

लातूर समाचार

## युद्ध संकटावर मात करण्यासाठी पर्याय द्या

युद्ध संकट केवळ भारतावर नाही तर जगावर संकट आले आहे. यावर कशाप्रकारे मात करायाची हे शोधले पाहिजे. काही झाले तर युद्धामुळे अनेक बाबीचे संकट आले आहे. यावर भारतीय मात करीत आहेत. सर्वात मोठे संकट म्हणजे स्वयंपाकाचा गॅस आहे. तो पुरवठा होण्यासाठी आडचण येत आहे. परदेशातून येणारा गॅस हा कमी पडत आहे. युद्धामुळे गॅस संकट उभा राहीले आहे. तरी भारत सरकारने यावर उपाय शोधला असून गॅसची कमतरता भासू देत नाही. मुळात भारतात मोठया प्रमाणात गॅस लागतो. आज पर्यंत या बाबत पर्याय शोधला गेला नाही. असे संकट येणार नाही असे वाटले होते. ते आता आले आहे. काही वर्षापुर्वी पेट्रोल व डिझेलची कमतरता भासेल म्हणून ई-व्हिकलचे उत्पादन सुरु केले. दोन व चार चाकी इलेक्ट्रिक गाड्याचे मोठ्या प्रमाणात उत्पादन केल्याने आता अनेक गाड्या ह्या चार्जिंगवर चालतात. त्याना इंधनाची गरज नाही. विद्युत निर्मिती घरोघरी होत आहे. अनेकांच्या घरावर सोलार संच बसविले आहेत. त्यामुळे वीज भारनियमचे प्रमाण कमी झाले आहे. काही झाले तरी पर्याय आवश्यक असतो. संकटावर मात करण्यासाठी पर्याय मिळविला पाहिजे. याकामी सरकारने मदत केली पाहिजे. अजून तरी सरकारने पर्याय दिला नाही किंवा नागरिकांनी शोधला नाही. पुर्वी गॅसची गरज नव्हती. आता कोठे ग्रामीण भागात या दहा-पंधरा वर्षात घरोघरी गॅस आला आहे. पुर्वी चुलीवरच सर्व स्वयंपाक होत होता. पुर्वी चुलीचा वापर होत होता. ग्रामीण भागत इंधन म्हणून पाला-पाचोला, लाकुड ते ही बिनकामाचे वाळलेले मिळत होते. शेतात धान काढल्यावर ज्या तुरीच्या काड्या होत्या त्याला तुराट्या त्या जाळल्या जात होत्या, सनकाड्याम्हणून वापर होत होता. ग्रामीण भागत जळण म्हणून अनेक बाबी सहज उपलब्ध होत होते. त्याच प्रमाणे ग्रामीण भागात आजही चुलीचा वापर होतो. शहरात होत नाही. सवय नाही. गॅस शिवाय पर्याय नाही. त्यासाठी सरकारने पर्याय उपलब्ध करून दिला पाहिजे. पर्याय मिळाल्यास ओरड होणार नाही. अजूनही रॉकेल काही भागात पोंहचले नाही. गॅस पंचवीस दिवसांनी मिळण्याची सोय केली आहे. केवळ बुकींग करून ती घरापोंच मिळाले पाहिजे. घरपोंच न देता ऑफीस व गोडावुन समोर गर्दी केली जात आहे. अजून तरी संकट मोठे नाही, तरी आता तज्ज्ञांनी गॅसला पर्याय शोधणे आवश्यक आहे. ते शोधलेच पाहिजे. आज कसे तरी या संकटावर मात करू शकू मात्र आगामी काळात असेच संकट उभे राहीले तर आवघड होणार आहे. त्यामुळे पर्याय सर्वांनी शोधला पाहिजे. एक तर गॅसचा वापर काटसरीने केला पाहिजे. गरीब मंडळी काटकसर करतील मात्र श्रीमंत मंडळीच मोठ्या प्रमाणात वापर करतील. वाटेल त्या किंमतीत काळ्या बाजारात खरेदी करू शकतील, गोरगरीबांनी जायचे कोठे? सध्याचे दर अनेकांच्या खिशाला परवडणारे नाहीत. त्यामुळे दर कमी करण्याबाबत विचार झाला पाहिजे. या बाबत सुट देता येईल का? या बाबत विचार करून पाच-दहा टक्के सुट सरकारकडून मिळणे अपेक्षित आहे. युद्धामुळे किंमतीत वाढ केली आहे. अचानक वाढीची ओरड नाही कारण भाव वाढले तरी खरेदी करावी लागते. गॅस शिवाय स्वयंपाक करणे अशक्य आहे. त्यामुळे सरकारने काही उपयोजनाबरोबर पर्याय जनतेला दिला पाहिजे. अधिक वापर सौरउर्जेचा करून घेणे अपेक्षित आहे. तसे उपकरणे बाजारात आणावी लागणार आहेत. काही झाले तरी पुन्हा घरोघरी चुली निर्माण झाल्यातर झाडे तोड अधिक प्रमाणात झाली तर नैसर्गिक संकट निर्माण होवू शकेल. त्यामुळे पर्याय हा योग्य व विचारपुर्वक दिला पाहिजे. संकटावर मात करण्यासाठी उपाय शोधला जावा मात्र ईतर नुकसान हाता कामा नये. सध्याला युद्ध संपेल असे वाटत नाही. कारण ईराणने अमेरिकेकडे नुकसान भरपाई मागीतली आहे. परत युद्ध करणार नाही अशी हमी मागीतली आहे. ह्या बाबी अमेरिका मान्य करेल असे वाटत नाही. त्यामुळे युद्धाचा शेवट होईल असे वाटत नाही. युद्ध अमेरिकेने छेडले आहे. ते आता थांबविणे आवघड दिसून येत आहे. ईराण माघार घेईल असे वाटत नाही. याला एक पर्याय म्हणजे काही काळासाठी युद्धविराम करावा लागणार आहे. हा पर्याय निघेल असे वाटत आहे. जो पर्यंत युद्ध चालू आहे तो पर्यंत व आगामी काही काळ गॅसचे संकट असणार आहे. त्यामुळे या संकटकाळात कशाप्रकारे मात करावयाचवी आहे, यावर उपयोजना शोधली जावी. सर्व बाबतीत पर्याय आहेत. यावरही पर्याय शोधला तर सापडणार आहे. त्यामुळे नागरिकांनी गॅस वापरताना कडक धोरणाची गरज आहे. अधिक वापर टाळवा लागणार आहे. शहरी भागात मोठी मागणी आहे हे सरकारला देखिल माहिती आहे. वास्तविक आता पर्यंत सर्व ठिकाणी रॉकेल पोंहचले पाहिजे होते. ते पोंहचले नाही. लहान गॅस टाकी सर्वत्र पुरविणे आवश्यक आहे त्यात ही दिरंगाई दिसून येते. अशा प्रकरामुळे आता सरकारने ठोस पर्याय जनतेला दिला पाहिजे. ज्यामुळे अशा संकटावर मात करता येवू शकेल. वास्तविक इंधनावर पर्याय ईलेक्ट्रीक गाड्या आहेत तशा प्रकारे स्वयंपाकासाठी पर्याय शोधला पाहिजे. तो वापरात आणला पाहिजे. गॅस भारतात कमी प्रमाणात उपलब्ध होतो त्यामुळे तर तो इतर देशातून मागवावा लागतो. ज्या देशात युद्ध चालू आहे तेथून मागविणे आवघड आहे. एकंदरीत अचानक उद्‌भवलेल्या संकटावर मात कशा प्रकारे करावी या बाबत पर्याय मिळविणे ही एक सर्वांची जबाबदारी आहे. भारत सरकारने काही कर कमी करावेत. ज्यामुळे गॅसचे दर कमी करता येवू शकेल. मुळात आपल्याकडे असे अचानक संकट येईल असे वाटले नाही. दिर्घ काळ युद्ध चालेल असेही वाटले नव्हते. हे संकट पुर्वनियोजित ही नव्हते. त्यामुळे यात नागरिकांनी संयम पाळला पाहिजे. नागरिकांनी चिंतन केले पाहिजे. एक चांगला पर्याय शोधला पाहिजे जेणे करून संकटावर मात करता येवू शकेल. तसे पाहिले तर दिर्घ काळ हे संकट नाही. युद्धाची झळ दोघांना एक ना एक दिवस जाणवणार आहे. आलेल्या संकटावर कशा प्रकारे मात करता येईल. असे संकट पुन्हा निर्माण झाले तर पर्याय आता पासून शोधला पाहिजे. पर्याय रिझर्व्ह असला पाहिजे. त्यामुळे पर्याय शोधवा लागेल.

# सिद्धेश्वर एक्सप्रेसने ५० गौरवशाली वर्षे पूर्ण केली

## सोलापूरला मुंबईशी जोडणारी जीवनवाहिनी सुवर्णमहोत्सव साजरा करत आहे



**सोलापूर/प्रतिनिधी :** मध्य रेल्वेचा सोलापूर विभाग, १२११६/१२११५ सोलापूर-मुंबई (छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस) सिद्धेश्वर सुपरफास्ट एक्सप्रेसचा सुवर्णमहोत्सव (सेवेची ५० वर्षे) अभिमानाने साजरा करत आहे. ८ एप्रिल १९७६ रोजी आपल्या सुरुवातीपासूनच, ही प्रतिष्ठित रेल्वेगाडी कनेक्टिव्हिटी (जोडणी), विश्वासार्हता आणि अभिमानाचे प्रतीक म्हणून उभी राहिली आहे. सोलापूर आणि मुंबई दरम्यान एक समर्पित रात्रीची सेवा ( ) उपलब्ध करून देण्यासाठी सुरू करण्यात आलेली सिद्धेश्वर एक्सप्रेस, गेल्या पाच दशकांमध्ये प्रवाशांसाठी सर्वात विश्वासार्ह आणि पसंतीच्या गाड्यांपैकी एक बनली आहे. दररोज हजारो प्रवासी, व्यावसायिक आणि तीर्थयात्रींची सेवा करत, ही गाडी सोलापूर हे वस्त्रोद्योगाचे केंद्र आणि राज्याची राजधानी यांच्यातील सामाजिक-आर्थिक संबंध दृढ करण्यात महत्त्वाची भूमिका बजावत आहे.

**काळाच्या ओघातील एक प्रवास**

सिद्धेश्वर एक्सप्रेसचे नाव हे, श्री बसवेश्वरांच्या शिकवणीचा प्रसार करणारे १२ व्या शतकातील कर्मयोगी संत श्री सिद्धरामेश्वर यांच्या नावावरून ठेवण्यात आले आहे; हे नामकरण या प्रदेशाचे सखोल सांस्कृतिक आणि आध्यात्मिक नाते दर्शवते. सुरुवातीला पारंपारिक डब्यांसह नॉन-एसी रात्रीची एक्सप्रेस म्हणून सुरू झालेली ही गाडी, भारतीय रेल्वेच्या आधुनिकीकरणाच्या प्रयत्नांनुसार गेल्या काही दशकांत उल्लेखनीय परिवर्तनातून गेली आहे. सुरुवातीच्या वर्षांतील डिझेल इंजिनद्वारे चालवल्या जाणाऱ्या सेवेपासून ते आजच्या -७ सारख्या उच्च-क्षमतेच्या इलेक्ट्रिक इंजिनांद्वारे पूर्णपणे विद्युतीकरण केलेल्या मार्गापर्यंतचा प्रवास, ही गाडी तांत्रिक प्रगतीचे उत्तम उदाहरण आहे. तिला सुपरफास्ट दर्जा मिळाल्यामुळे प्रवासाचा वेळ लक्षणीयरीत्या कमी झाला आणि कार्यक्षमता वाढली, ज्यामुळे मुंबई-पुणे-सोलापूर या व्यस्त मार्गावर तिला एक प्राधान्य सेवा म्हणून स्थान मिळाले.

आधुनिकीकरणाच्या प्रवासातील एक महत्त्वाचा टप्पा नोव्हेंबर २०१८ मध्ये गाठला गेला, जेव्हा या गाडीचे डबे अद्ययावत डब्यांमध्ये रूपांतरित करण्यात आले; यामुळे सुधारित सुरक्षा, अधिक वेग क्षमता आणि प्रवाशांना उत्कृष्ट आराम मिळणे सुनिश्चित झाले. सध्याच्या डब्यांच्या रचनेत २२ आधुनिक डब्यांचा समावेश आहे. यामध्ये एसी प्रथम श्रेणी, एसी २-टायर, एसी ३-टायर, एसी ३-टायर इकॉनॉमी, स्लीपर क्लास आणि सामान्य अनारक्षित डब्यांचा समावेश असून, ते सर्व स्तरांतील प्रवाशांच्या गरजा पूर्ण करतात. सुमारे ८ तास ५ मिनिटांच्या कालावधीत ४५५ किमीचे अंतर कापत धावणारी सिद्धेश्वर एक्सप्रेस, मोहोळ, माढा, कुर्डुवाडी, जेऊर, दौंड, पुणे, कल्याण, ठाणे आणि दादर यांसारख्या महत्त्वाच्या स्थानकांना जोडते. काही निवडक टप्प्यांवर १३० किमी/तास इतक्या कमाल वेगमर्यादेसह धावणारी ही गाडी, एक कौतुकास्पद सरासरी वेग राखते; ज्यामुळे प्रवासाची वेळेवर आणि कार्यक्षम पूर्तता सुनिश्चित होते.

**लोकांसाठी जीवनवाहिनी**

सोलापूर आणि लगतच्या परिसरातील लोकांसाठी, सिद्धेश्वर एक्सप्रेस ही केवळ एक रेल्वेगाडी नसून, ती एक जीवनवाहिनी आहे. तिचे अत्यंत विचारपूर्वक आखलेले वेळापत्रक प्रवाशांना सोलापूरहून सायंकाळी निघून मुंबईला पहाटे लवकर पोहोचणे (आणि परतीच्या प्रवासातही तसेच) शक्य करते; ज्यामुळे व्यावसायिक, प्रशासकीय आणि कायदेशीर कामांसाठी प्रवास करणाऱ्यांकरिता ही गाडी अत्यंत सोयीस्कर ठरते. विशेषतः सुप्रसिद्ध श्री सिद्धेश्वर गड्डा यात्रा सुरू असताना, तीर्थयात्रेचा प्रवास सुलभ करण्यातही ही गाडी महत्त्वाची भूमिका बजावते; ज्यामुळे तिचे सांस्कृतिक महत्त्व अधिकच अधोरेखित होते. याव्यतिरिक्त, सोलापूरहून पंढरपूर, तुळजापूर, अक्कलकोट आणि गाणगापुर यांसारख्या धार्मिक केंद्रांशी संपर्क साधण्यासाठीही ही गाडी दुवा म्हणून काम करते.

या ऐतिहासिक प्रसंगी, सोलापूर विभाग सुरक्षा, आराम आणि वक्तशीरपणा या बाबींमध्ये सातत्याने सुधारणा करून प्रवाशांचा अनुभव अधिक समृद्ध करण्याच्या आपल्या कटिबद्धतेचा पुनरुच्चार करत आहे. ५० वर्षांच्या अखंड सेवेची पूर्तता हा केवळ या प्रतिष्ठित गाडीच्या इतिहासातील एक महत्त्वाचा टप्पा (मैलाचा दगड) नाही, तर रेल्वे प्रशासन आणि ज्यांची सेवा ती करते त्या जनतेमधील अतूट बंधाचा तो एक उत्सवच आहे. सिद्धेश्वर एक्सप्रेसवर आपला विश्वास दर्शवणाऱ्या प्रवाशांच्या पिढ्यान्पिढ्यांप्रती सोलापूर विभाग आपली मनःपूर्वक कृतज्ञता व्यक्त करतो. आपल्या प्रवासाच्या पुढील टप्प्यात पदार्पण करत असताना, सिद्धेश्वर एक्सप्रेस आपला समृद्ध वारसा पुढे चालवत राहीललोकांना जोडत, प्रगतीला गती देत आणि भारतीय रेल्वेच्या आत्म्याचे यथार्थ दर्शन घडवत.

# गॅस टंचाईविरोधात निलंग्यात 'चुली पेटवून' आंदोलन

**निलंगा/आयुब बागवान :** घरगुती गॅस सिलेंडरच्या टंचाईने हैराण झालेल्या नागरिकांच्या प्रश्नाला वाचा फोडण्यासाठी निलंग्यात वंचित बहुजन आघाडीने अनोख्या पद्धतीने आंदोलन छेडले. उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर थेट रस्त्यावर पारंपरिक चुली मांडत भाकरी आणि चहा बनवून कार्यकर्त्यांनी प्रशासनाचे लक्ष वेधले.

राज्यात सुरू असलेल्या 'नरेंदर कब मिलेगा सिलेंडर' या राज्यव्यापी आंदोलनाचा भाग म्हणून निलंग्यात हे लक्षवेधी आंदोलन पार पडले. महिला जिल्हाध्यक्षा मंजुषाताई निंबाळकर यांच्या नेतृत्वाखाली देवणी, शिरूर अनंतपाळ आणि निलंगा तालुक्यातील कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला.

उन्हाळ्याच्या कडाक्यात महिलांनी लाकडांच्या चुली पेटवून स्वयंपाक करत गॅस अभावी नागरिकांना भेडसावणाऱ्या अडचणींचे प्रतीकात्मक चित्र उभे केले. ''सामान्य माणसाला गॅस कधी मिळणार?'', ''जनता मांगे सिलेंडर, सरकार गप्प का?'' अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला.



हातात विविध फलक घेऊन कार्यकर्त्यांनी केंद्र व राज्य सरकारच्या धोरणांवर टीका केली. गॅस सिलेंडरचा नियमित पुरवठा सुरू करावा, दर कमी करावेत आणि सर्वसामान्यांना दिलासा द्यावा, अशा मागण्यांचे निवेदन उपविभागीय अधिकाऱ्यांना देण्यात आले. या आंदोलनात डॉ. हिरालाल निंबाळकर, तालुका प्रभारी देवदत्त सूर्यवंशी, मोहन सूर्यवंशी, श्रीमंत बनसोडे, साहेबराव कांबळे, अय्युब कुरेशी, व्यंकट सूर्यवंशी, अरबाज शेख, विशाखा हातागळे, पुष्पा कांबळे, सुनीता लोकरे, शाहरुख कुरेशी यांच्यासह महिला व पुरुष कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले.

या फलकामुळे जनतेचे वेधले लक्ष....

हॉटेल्स भोजनालय मध्यमवर्गीयांना गॅस सिलेंडर कधी मिळणार, आहो नरेंदर कधी मिळणार सर्वसामान्य माणसाला गॅस सिलेंडर, जनता मांगे सिलेंडर चूप बैठा है नरेंदर, सिलेंडर चा नियमित पुरवठा कधी होणार, नरेंदर मोदी को ट्रम्प का डर नही मिल रहा गॅस सिलेंडर अश्या विविध फलक हातात घेऊन केंद्र व राज्य सरकारचा निषेध व्यक्त करण्यात आला.

# अहमदपूर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त भव्य रक्तदान शिबीर!, सम्राट मित्र मंडळाचा उपक्रम

**अहमदपूर/प्रतिनिधी :** सामाजिक बांधिलकीची जाणीव आणि मानवतेचा संदेश जपत, सम्राट मित्र मंडळ सामाजिक संघटना, अहमदपूर यांच्या वतीने विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त एक भव्य आणि प्रेरणादायी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले.यात १०१ रक्तदात्यांनी रक्तदान करून अनोख्या पध्दतीने अभिवादन केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकासमोर आयोजित या रक्तदान शिबिराचे उद्घाटन पूज्य भंते महाविरोध थेरो (काळेगाव) यांच्या प्रमुख उपस्थितीत अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ नेते गोपीनाथरावजी जोंधळे साहेब हे होते.

या प्रसंगी,भीमसैनिकांनी केवळ घोषणांनी नव्हे तर प्रत्यक्ष कृतीतून आपल्या महामानवाला अभिवादन केले. ''रक्तदान हेच श्रेष्ठ दान'' या विचाराने प्रेरित होऊन तब्बल १०१ जणांनी रक्तदान करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीला एक आगळावेगळा आणि हृदयस्पर्शी सन्मान अर्पण केला.

संपूर्ण दिवस रक्तदान करणाऱ्या युवकांचा उत्साह, समाजाप्रती असलेली जबाबदारी आणि महामानवांविषयीची कृतज्ञता यांचे दर्शन घडवत होता. हा उपक्रम केवळ एक कार्यक्रम नसून, समाजातील एकतेचा, सेवाभावाचा आणि मानवतेचा सजीव संदेश ठरला.



सदर उपक्रम यशस्वी करण्यासाठी सम्राट मित्र मंडळाचे तालुका अध्यक्ष शरद सोनकांबळे, शहराध्यक्ष बजरंग गायकवाड, ग्रामपंचायत सदस्य संतोष गायकवाड, सचिन वाघमारे, महादेव बनसोडे, बालाजी ढवळे,शरद कांबळे ,सचिन बानाटे, आकाश पवार, शिक्षक नेते शिवाजीराव भालेराव,संविधान कदम, राहुल वाघमारे, रितेश रायभोळे, डॉ. बालाजी थिट्टे, चंद्रकांत कांबळे, विकास कांबळे, यादव सोनकांबळे, धोंडूतात्या शिंदे, रत्नदीप प्रचंडेकर, लखन गायकवाड, मिलिंद कदम, गौतम कांबळे, माधवराव तिगोटे ,सिद्धार्थ गायकवाड,मोहम्मद पठाण, रोहण जाधव, बालाजी मस्के, प्रशांतजी जाभाडे, राजकुमार नरवटे राळगा सरपंच, विकास ससाणे,साई कांबळे, आकाश वाघमारे सोनू सोनकांबळे रमेश लेंडेगावकर, जयराम चिलकरवाड, जय गुळवे, अभय गायकवाड, हर्ष भालेराव, शुभम कांबळे,उत्तम गायकवाड संगमेश्वर बनसोडे सतीश कदम,प्रदीप जाभाडे, संतोष सोनकांबळे विकास ससाणे, साई कांबळे,आकाश वाघमारे सोनू सोनकांबळे रमेश लेंडेगावकर सर,शरद शिंदे कोणाळीकर, जयराम चिलकरवाड आदी कार्यकर्त्यांनी अथक परिश्रम घेतले.

शेवटी, या रक्तदान शिबिराने पुन्हा एकदा सिद्ध केले की, महामानवांचे विचार केवळ पुस्तकांत नाहीत, तर ते कृतीतून जिवंत ठेवले जातात हे पून्हा एकदा सिध्द झाले.

## डिजिटल प्रशासनाची नवी दिशा : नांदेड पोलीस परिक्षेत्राचा राज्यात अव्वल ठसा

महाराष्ट्र शासनाने प्रशासन अधिक पारदर्शक, गतिमान आणि लोकाभिमुख करण्याच्या उद्देशाने राबविलेला १५० दिवसीय ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रम हा राज्याच्या प्रशासकीय यंत्रणेसाठी एक महत्त्वाचा टप्पा ठरला आहे. या उपक्रमात नांदेड पोलीस परिक्षेत्राने राज्यात प्रथम क्रमांक पटकावत केवळ यश मिळवले नाही, तर आधुनिक प्रशासनाचा एक आदर्श नमुना निर्माण केला आहे.

मा. मुख्यमंत्री महोदय, महाराष्ट्र राज्य यांनी दिलेल्या निर्देशानुसार राज्यात राबविण्यात आलेल्या १५० दिवसीय ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमाच्या मुल्यमापनात नांदेड पोलीस परिक्षेत्र कार्यालयाने राज्यातील सर्व परिक्षेत्रांत प्रथम क्रमांक पटकावून उल्लेखनीय यश संपादन केले आहे. याबाबत शनिवार २८ मार्च रोजी मुंबईतील सह्याद्री अतिथीगृह येथे संपन्न झालेल्या बक्षीस वितरण समारंभात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांना प्रशस्तीपत्र देऊन त्यांचा गौरव केला आहे.

आजच्या डिजिटल युगात प्रशासनाचे स्वरूप वेगाने बदलत आहे. नागरिकांच्या अपेक्षा वाढल्या असून सेवा अधिक जलद, अचूक आणि सुलभ पद्धतीने मिळाव्यात ही काळाची गरज आहे. या पार्श्वभूमीवर नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांच्या नेतृत्वाखाली नांदेड परिक्षेत्राने तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून प्रशासनात आमूलाग्र बदल घडवून आणले.

ई-गव्हर्नन्स कार्यक्रमांतर्गत राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांमध्ये संकेतस्थळाचे आधुनिकीकरण हा एक महत्त्वाचा भाग ठरला. नव्याने विकसित केलेले संकेतस्थळ अधिक सुरक्षित, सुलभ आणि नागरिकाभिमुख बनविण्यात आले. विविध शासकीय योजना व सेवा एका क्लिकवर उपलब्ध करून देण्यात आल्या, ज्यामुळे नागरिकांना कार्यालयाच्या फेऱ्या मारण्याची गरज मोठ्या प्रमाणात कमी झाली. 'आपले सरकार' पोर्टलद्वारे नागरिकांच्या तक्रारींचे वेळेत निराकरण करण्यावर विशेष भर देण्यात आला. तक्रार नोंदणीपासून ते तिच्या निकाली काढण्यापर्यंतची संपूर्ण प्रक्रिया पारदर्शक करण्यात आली. यामुळे नागरिकांचा प्रशासनावरील विश्वास अधिक दृढ झाला.

ई-ऑफिस प्रणालीचा अवलंब करून कागदविरहित काम काजाला चालना देण्यात आली. फाईल निपटारा जलद गतीने होऊ लागला, तसेच निर्णयप्रक्रियेत विलंब कमी झाला. इंटरॅक्टिव्ह डॅशबोर्डच्या माध्यमातून अद्ययावत व अचूक माहिती उपलब्ध करून देण्यात आली, ज्यामुळे वरिष्ठ अधिकाऱ्यांना कामकाजावर प्रभावी देखरेख ठेवणे शक्य झाले.

नांदेड परिक्षेत्राची खासियत म्हणजे केवळ पारंपरिक सुधारणा न करता नाविन्यपूर्ण तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला. 'संवेदना' ही कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आधारित संगणकीय प्रणाली अर्ज चौकशीसाठी सुरू करण्यात आली, ज्यामुळे नागरिकांना तत्काळ माहिती मिळू लागली. 'एुत एब' प्रणालीद्वारे गुन्हे तपासावर बारकाईने लक्ष ठेवता येऊ लागले, तर 'खबर' हेल्पलाईनमुळे गैरप्रकार आणि अवैध व्यवसायांविरोधात नागरिकांना थेट तक्रार नोंदविण्याचे सशक्त माध्यम मिळाले.

याशिवाय तक्रारदारांच्या समाधानाची पातळी जाणून घेण्यासाठी फीडबॅक प्रणाली सुरू करण्यात आली, हीदेखील एक महत्त्वपूर्ण पायरी ठरली. यामुळे सेवांची गुणवत्ता सातत्याने सुधारण्यास मदत झाली. या सर्व उपक्रमांमुळे प्रशासन अधिक उत्तरदायी, पारदर्शक आणि कार्यक्षम बनले आहे. नागरिकांना सेवा देण्याची प्रक्रिया सुलभ झाल्यामुळे शासन आणि नागरिक यांच्यातील दरी कमी झाली आहे. डिजिटल माध्यमातून संवाद वाढल्यामुळे प्रशासन अधिक विश्वासार्ह बनले आहे.

या यशामागे सक्षम नेतृत्वासोबतच संघभावना आणि सातत्यपूर्ण प्रयत्न महत्त्वाचे ठरले. पोलीस अधिकारी, अंमलदार, मंत्रालयीन कर्मचारी तसेच तांत्रिक तज्ज्ञ यांच्या समन्वयातून हा बदल शक्य झाला. सॉफ्टवेअर अभियंत्यांनी विकसित केलेल्या प्रणालींमुळे प्रशासनाच्या डिजिटल परिवर्तनाला गती मिळाली.

यापूर्वी १०० दिवसांच्या कृती आराखड्यात नांदेड परिक्षेत्राने राज्यात द्वितीय क्रमांक मिळविला होता. त्यामुळे सातत्याने उत्कृष्ट कामगिरी करण्याची परंपरा या परिक्षेत्राने जपली आहे. १५० दिवसीय कार्यक्रमात मिळालेला प्रथम क्रमांक ही त्या प्रवासातील महत्त्वाची पायरी आहे. नांदेड पोलीस परिक्षेत्राची ही यशोगाथा इतर शासकीय विभागांसाठी प्रेरणादायी ठरावी, अशी अपेक्षा आहे. तंत्रज्ञानाचा योग्य वापर, प्रभावी नियोजन आणि नागरिककेंद्रित दृष्टीकोन यांच्या मदतीने प्रशासन अधिक सक्षम कसे होऊ शकते याचे हे उत्कृष्ट उदाहरण आहे. भविष्यात अशाच नाविन्यपूर्ण उपक्रमांच्या माध्यमातून प्रशासन अधिक सक्षम, पारदर्शक आणि जनतेच्या अपेक्षांना पूरक ठरेल यात शंका नाही. नांदेड परिक्षेत्राने घालून दिलेला हा आदर्श राज्याच्या डिजिटल प्रगतीसाठी मार्गदर्शक ठरणारा आहे.

**-- अलका पाटील**

## हृदयविकाराच्या झटक्याने एखाद्याचे प्राण वाचवण्याकरिता हे करा

अयोग्य जीवनशैली आणि खाण्याच्या सवयींमुळे अनेक लोक हृदयाशी संबंधित आजारांनी ग्रस्त आहेत. अलिकडच्या काळात हृदयविकार आणि स्ट्रोकच्या घटनांमध्ये झालेली वाढ ही चिंतेचा विषय बनली आहे. एक काळ असा होता, जेव्हा हृदयविकाराचे झटके फक्त वृद्धांमध्येच सामान्य होते, परंतु आज तरुण लोक आणि मुले देखील हृदयविकाराच्या झटक्याने आपले प्राण गमावत आहेत. या लेखात, छातीत दुखणे किंवा हृदयविकाराची लक्षणे आढळल्यास काय करावे ते जाणून घेऊया...

या सूचनांचे पालन करताना काळजी घ्या: छातीत दुखणे आणि हृदयविकाराच्या लक्षणांकडे दुर्लक्ष करू नये. अशा वेळी काही खबरदारी ताबडतोब घेणे गरजेचं आहे, अन्यथा ते प्राणघातक ठरू शकतात. जर तुम्हाला छातीत दुखणे किंवा कोणतीही अस्वस्थता जाणवत असेल तर विलंब न करता वैद्यकीय मदत घ्या. जवळील रुग्णालयाशी ताबडतोब संपर्क साधा.

जर तुम्हाला छातीत दुखत असेल तर घाबरू नका; एका ठिकाणी शांत बसा आणि शांत राहण्याचा प्रयत्न करा. कारण ताण आणि चिंता हृदयरोग वाढवू शकतात. जर तुमच्या समोरची व्यक्ती बेशुद्ध झाली असेल किंवा हृदयविकाराच्या झटक्याने श्वास घेत नसेल तर ताबडतोब सीपीआर द्या. यासाठी त्यांच्या छातीच्या मध्यभागी दोन्ही हातांनी दाबणे आवश्यक आहे. जर ऑटोमेटेड एक्सटर्नल डिफिब्रिलेटर (अए) उपलब्ध असेल तर ते निर्देशानुसार वापरावे. अए हृदयाची लय पुनर्सचयित करण्यास मदत करते. आवश्यक असल्यास इलेक्ट्रिक शॉक देखील देऊ शकता. लक्षात ठेवा की प्रत्येक छातीत दुखणे हे हृदयविकाराचा झटका किंवा हृदयविकाराच्या झटक्याचे लक्षण नसू शकते. छातीत दुखण्याची इतर कारणे देखील असू शकतात, जसे की स्नायूंचा ताण, मानसिक ताण आणि अपचन. परंतु, छातीत दुखणे कधीही हलके घेऊ नये. ताबडतोब वैद्यकीय मदत घेणे चांगले. हृदयविकाराची लक्षणे हृदयविकाराची लक्षणे व्यक्तीपरत्वे वेगवेगळी असतात. त्यात खालील कारणं समाविष्ट असू शकतात. अचानक छातीत दुखणे किंवा अस्वस्थता वेदना जी डाव्या किंवा उजव्या हातापर्यंत किंवा मान, जबडा, पाठ किंवा पोटापर्यंत पसरू शकते. काही लोकांना तीव्र वेदना किंवा कडकपणा जाणवतो, तर काहींना अस्वस्थता जाणवते. तसंच ते अपचनाच्या बाबतीत घडणाऱ्या वेदनांसारखेच, जास्त दाब किंवा जळजळ जाणवू शकते.

आजारी वाटणे, घाम येणे, चक्कर येणे किंवा श्वास घेण्यास त्रास होणे.



# हिंसाचार कायद्याचा गैरवापर नको

**कायदा समजून घेताना**

केवळ सुडापोटी सासरच्या लोकांवर गुन्हे दाखल होत असल्याबद्दल यापूर्वी देखील सर्वोच्च न्यायालयाने कनिष्ठ न्यायालयांना मार्गदर्शन केले आहे. विविध खटल्यांचा संदर्भ देत बहुतांश खटल्यात केवळ स्वतः च्या मागण्या पूर्ण करून या कायद्याचा धाक दाखवत महिला गुन्हे दाखल करत आहेत. त्यामुळे या कायद्याचा गैरवापर वाढल्याचे दिसून येत आहे. भारतीय दंड संहिता कलम ४९८ अ कलम हे कौटुंबिक हिंसाचार पीडित महिलांना त्वरित न्याय मिळावा यादृष्टीने अस्तित्वात आले. मात्र, त्याचा गैरवापर वाढला असून, केवळ वैयक्तिक सूड उगवण्यासाठी अशा तक्रारींमध्ये नातेवाईकांची नावे टाकली जातात. ही बाब अनेकदा निदर्शनास आली असून, बहुतांश वेळा न्यायालयाने सांगून देखील, असे खटले दाखल होतात. ही खेदाची बाब आहे. स्वतःच्या अवास्तव मागण्याची पूर्तता करण्यासाठी व या मागण्या पूर्ण झाल्या नाही तर, नातेवाईकांची सरसकट नावे टाकून या कलमाद्वारे गुन्हा दाखल करायचा, ही पद्धत अवलंबली जात आहे. जी खूप चिंताजनक आहे. ज्या महिला खरोखरच या अत्याचाराला बळी पडतात त्यांनी विना विलंब तक्रारी दाखल करणे अपेक्षित असते.


मात्र, जेव्हा पती घटस्फोटाचा अर्ज दाखल करतो तेव्हा, या अशा कलमाद्वारे गुन्हा दाखल करतात. त्या महिलांना आळा बसला पाहिज, असे मत सर्वोच्च न्यायालयाने व्यक्त केले आहे. आठ दिवसांपूर्वी दिनांक २५ मार्च २०२६ रोजी चारुल शुक्ला विरुद्ध उत्तर प्रदेश राज्य व इतर या अपिलात विशेष रजा याचिका ५५५/२०२४ मध्ये सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती बी.व्ही. नागरत्ना व न्यायमूर्ती उज्जल भुयान यांच्या पीठाने हे मत व्यक्त करून, तक्रारदार महिलेच्या पतीकडील नातेवाईकांचे अपील मंजूर करीत, त्यांच्यावरील गुन्हे रद्द करण्याचा आदेश दिला आहे.अपिलाची हकीकत अशी की, तक्रारदार महिला व तिचा पती उत्कर्ष अवस्थी यांचा विवाह १६ एप्रिल २०१७ रोजी झाला. तिचा पती गाजियाबाद उत्तर प्रदेश येथे नोकरी करीत असल्याने, ती पाच दिवसानंतर त्याच्याबरोबर राहण्यासाठी गेली. त्यानंतर सहा वर्षे सात महिन्यांनी तिने १५ नोव्हेंबर २०२३ रोजी आपल्याला सासरच्या लोकांनी त्रास दिला असून, आपल्या नणंदेने तिच्या पतीबरोबर तक्रारदार महिलेचे संबंध असल्याचे पतीला सांगून त्याचे मनामध्ये आपल्याबद्दल राग निर्माण करून त्रास दिला. तसेच जुलै २०१७ साली आपण दोन महिन्यांची गरोदर असताना आपल्याला मूल होऊ नये म्हणून, पती, नणंद व सासू-सासरे यांनी खोलीत ओढून, नणंदेने डोक्याचे केस धरून मारहाण केली व पतीने पोटात लाथा मारल्याने आपला गर्भपात झाला. त्यानंतर आपल्या पतीच्या गैरहजेरीत आपल्या सासर्याने आपला विनयभंग केला. त्याला विरोध केला असता, त्याने आपल्याला थोबाडीत मारले. अशाप्रकारे लग्न झाल्या दिवसांपासून आपल्याला हुंड्या पोटी आठ लाख पन्नास हजार रुपये व मोटार आणावी म्हणून, सासरच्या लोकांनी आपला छळ केला व १२ नोव्हेंबर २०२३ साली आपल्याला मारहाण करून, आपले दाग-दागिने हिसकावून घेऊन सासरच्या लोकांनी हाकलून दिले आहे. अशा आशयाची तक्रार माहेरी जाऊन दिली. तिथे सदर महिलेच्या तक्रारीनुसार पोलिसांनी तिची नणंद, सासू व सासरे यांच्याविरुद्ध भारतीय दंड सहिता ४९८ अ, ३२३, ३१३ नुसार व हुंडा प्रतिबंधक कायदा १९६१ कलम ३ व ४ नुसार गुन्हा दाखल केला. दोषारोप पत्र दाखल करताना, कलम ३१३ रद्द करून त्याऐवजी ३५४ ची वाढ करून वरील गुन्हे दाखल केले. सदर गुन्हे रद्द व्हावेत म्हणून, या अपील मधील अपीलकर्ते सासू, सासरे व नणंद यांनी अलाहाबाद उच्च न्यायालयामध्ये याचिका दाखल केली. मात्र, उच्च न्यायालयाने सदर गुन्ह्यामध्ये विनयभंगासारखा तसेच गर्भपातासारखा गंभीर गुन्हा असल्याने सदर गुन्हे रद्द करण्यासाठी केलेली याचिका फेटाळून लावली. सदर निर्णयावर व्यथित होऊन तक्रारदार महिलेचे सासू-सासरे व नणंद यांनी सर्वोन्यायालयात अपील केले.

सर्वोच्च न्यायालयाने सदर अपिलकर्ते यांनी तपासात सहकार्य करावे व त्यांच्याविरुद्ध कठोर कारवाई करू नये, म्हणून आदेश दिला. त्यानंतर अपिलाची सुनावणी करताना स्पष्ट केले की, विनयभंग चा गुन्हा फक्त सासरेविरुद्ध आहे तसेच दोषारोप पत्रातून ३१३ चा गर्भपाताचा गुन्हा रद्द केला आहे. ही बाब लक्षात घेता फक्त उर्वरित गुन्हे हुंडा प्रतिबंधक कायदा कलम ३ व ४ चे गुन्हे तसेच कलम ४९८ अ व ३२३ एवढे गुन्हे दाखल आहेत. सदर गुन्ह्यामध्ये तक्रारदार महिलेला नोटीस काढण्यात आली. मात्र, ती हजर झाली नाही. तसेच नणंद व सासू-सासरे हे सर्व नोकरदार आहेत. नणंद लग्नानंतर कधीही तक्रारदार महिलेच्या घरी गेली नव्हती. सासरे ७१ वर्षीय वकील आहेत. सासू सेवानिवृत्त सरकारी नोकर आहे, अशा परिस्थितीमध्ये हुंड्यासाठी छळ केला, ही बाब शक्य वाटत नाही. कारण, या तक्रारदार महिलेने गर्भपात विषयी अथवा विनयभंगाविषयी एक ही पुरावा न्यायालय पुढे आणलेला नाही. त्यामुळे दोषारोप पत्रातून गर्भपाताचा गुन्हा कमी केला असल्याचे दिसले आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे लग्न झाल्यापासून या महिलेचा छळ होत होता तर, तिने एकदा तरी पोलीस स्टेशनला तक्रार नोंदवायला हवी होती. तसेच सासरे वकील असल्याने त्यांनी त्यांच्या प्रतिष्ठेमुळे तिला दबाव आणण्याचा देखील पुरावा समोर आला नाही. याशिवाय या महिलेने तक्रार दाखल करणेसाठी सहा वर्षे सात महिने इतका अवधी का लावला, त्याबाबत देखील स्पष्टीकरण दिले नाही. त्यामुळे या गुन्ह्यात सत्यता दिसत नाही, कौटुंबिक हिंसाचार खटल्यामध्ये सहसा पुरावे सहजासहजी मिळत नाहीत व वर्षानुवर्ष उशीरा गुन्हे दाखल झाले तर, ते तक्रारदाराला घातक ठरते. जी व्यक्ती आपल्या अधिकाराबाबत जागरूक नसते तिला कायद्याने संरक्षण मिळवण्यास अडचण येत असते. या तत्वामुळे जर एखाद्या महिलेवर अन्याय झाला तर, तिने त्वरीत त्याबाबत तक्रार करणे गरजेचे असते.

या खटल्यात आपल्या पतीविरुद्ध तक्रार न करता केवळ सासू-सासरे, नणंद यांच्या विरुद्ध तक्रार केली असल्याने तसेच सर्वोच्च न्यायालयात नोटीस मिळून सुद्धा हजर न राहिल्याने तिच्या तक्रारीत तथ्य नसून, केवळ सासरच्या लोकांना अडकवणे, हाच उद्देश यात दिसत आहे. आजकाल केवळ सुडापोटी सासरच्या लोकांवर गुन्हे दाखल होत असल्याबद्दल यापूर्वी देखील सर्वोच्च न्यायालयाने कनिष्ठ न्यायालयांना मार्गदर्शन केले आहे. विविध खटल्यांचा संदर्भ देत बहुतांश खटल्यात केवळ स्वतः च्या मागण्या पूर्ण करून या कायद्याचा धाक दाखवत महिला गुन्हे दाखल करत आहेत. त्यामुळे या कायद्याचा गैरवापर वाढल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे फक्त तोंडी विना पुरावा व विलंबाने केलेल्या तक्रारीत तथ्य नसल्याने न्यायालयाने सदर अपिलकर्ते यांचे अपील मंजूर करून त्यांच्यावरील गुन्हे रद्द करण्याचे आदेश दिले आहेत.एकूणच कलम ४९८ अ नुसार गुन्हे दाखल करताना न्यायालयांनी व पोलिसांनी काळजी घेण्याची गरज असल्याचे, पुन्हा एकदा सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे.

**ॲड. जी.एम. आळंदीकर**
**(बारामती, मो. ९४२३०२०२५५)**

# जादू बंगाली बाबांची! भाग १



गुन्हे प्रकटीकरण अधिकारी म्हणून, दहा पोलीसांच्या मदतीने पो.ठाणे हद्दीत घडणारे खून, खूनाचे प्रयत्न, दरोडे, जबरी चोऱ्या, बलात्कार अशा गंभीर स्वरूपाच्या गुन्ह्यांची उकल करणे हे माझ्यावर सोपविलेले विशेष काम होते. त्या दिवशी सकाळी मी न्यायालयांत सादर करण्याच्या अहवालाचे काम करीत असतांना मला वरिष्ठ पो. निरीक्षकांनी बोलावले. मी त्यांच्यासमोर बसताच त्यांनी बोलायला सुरूवात केली. सहाय्यक आयुक्तांच्या, परिचयाच्या एका डॉक्टर महिलेला काही त्रास झाला आहे व प्रकरण अतिशय नाजूक हाताळणे आवश्यक आहे. ते एखाद्या विशेष अधिकाऱ्याच्या हातांत सोपवावे. बाकी माहिती त्या डॉक्टर स्वत:च देतील. तेव्हा तू त्यांना भेटून पुढील आवश्यक ती कारवाई कर. थोडयाच वेळात डॉक्टर मॅडम आल्यावर, वरिष्ठ निरीक्षकांनी मला बोलावले.प्राथमिक परिचयानंतर सदर डॉक्टर महिलेने अतिशय अडखळत पतीकडे कटाक्ष टाकीत निवेदनाला सुरूवात केली. मी ठाण्यात वैद्यकीय व्यवसाय करते. एका परिचित महिलेकडून, सौंदर्य प्रसाधने व इतर वस्तू खरेदी करीत असे. कारण तिच्याकडे परदेशी वस्तू सहजपणे उपलब्ध होत असत. बिलाबद्दल विचारले असता, बेफिकीरीने नंतर हिशोब करू असे म्हणत. एकदा मी बीलाबद्दल फारच आग्रह धरल्यावर, त्यांनी जी रक्कम सांगितली तेव्हा मला माझी फसवणूक झाल्याचे लक्षात आले. परंतू त्या वस्तू वापरायला सुरूवात केली असल्याने मला त्या महिलेने सांगितलेली रक्कम देण्याखेरीज पर्यायच उरला नव्हता. संध्याकाळी पतीनेही तुझ्यासारख्या सुक्षिशित बाईने तरी फसवले जायला नको होते. असे म्हटल्यावर अधिकच मन:स्ताप झाला! दुस-या दिवशी पती व्यवसायानिमित्त व मुलगा बालवाडीत गेल्यावर अस्वस्थपणे त्यांनी स्थानिक वृत्तपत्र चाळायला सुरूवात केली. अचानक त्यांची नजर एका जाहिरातीवर खिळली. बाबा नवरत्न बंगाली ह्या तांत्रिकाची जाहिरात त्यांना विचारात पाडून गेली. एकतर्फी प्रेम साकार होण्यासाठी, फसवणूक झाल्यावर नुकसान भरून काढण्यासाठी आणि अशा अनेक कारणांसाठी बाबाची बंगाली जादू 'अक्सिर इलाज' ठरणार होती. प्रचिती न आल्यास पैसे परत देण्याची हमी दिली होती. त्यांनी लगेच फोनवर संपर्क साधला. बाबांनी त्यांच्या फसवणूकीची माहिती घेतली. फसवणूक झालेली रक्कम रू १०,०००/ च्या घरात असल्याचे समजल्यानंतर बाबांनी सांगितले की केवळ एक पूजा करावी लागेल. फसवणूक करणारी व्यक्ती आपणहून जास्त घेतलेली रक्कम परत करेल. पूजेला साधारण रू.१२००/- खर्च येईल. डॉक्टर मॅडमनी रू.१२००/- देऊन पूजा करून घ्यायचे ठरविले आणि बाबांच्या ऑफिसमध्ये रक्कम जमा केली. संपर्कासाठी आपला नंबर दिला. तिस-या दिवशी फोन आला. थोडयाशा भेदरलेल्या बाबांनी सांगितले की त्यांनी नियोजित पूजा केली. परंतू समोरची व्यक्ती कल्पनेपेक्षा जास्त प्रभावी असल्याने, त्यांची पूजा त्यांच्यावरच उलटली आहे. तेव्हा कार्यालयात येऊन भेटावे. उलटलेल्या जादूचा मॅडम आणि त्यांचे कुटुंबीय ह्यांच्यावर काही परिणाम होणार आहे हे पडताळण्यासाठी, कागदात थोडे तांदूळ बांधून पुडी दिली व ती कपाटात उघडयावर ठेवावी. दोन दिवसानंतर ती पहावी. मधेच उघडू नये असे सांगितले. दोन दिवसानंतर पुडीचा कागद करपलेला आढळल्यावर, डॉक्टर हादरल्या व त्यांनी बाबांकडे धाव घेतली. बाबा विचारात पडला व त्याने आणखी एक पूजा करायला सांगितली. त्यासाठी लागणारी रू २०५०/- ची रक्कम निमूटपणे समोर ठेवली. परंतु दुस-या दिवशी बाबांनी मॅडमना समोर बसवले. कार्यालयातील मुख्य दिवा बंद करून एक लाल दिवा लावला.जमिनीवर काही आकृती काढून, त्यात एक गोल तळाचे छोटे मडके ठेवले व पूजा सुरू झाली. पूजेनंतर त्यांनी डॉक्टर मॅडमना सांगितले की त्यांच्या कुटूंबामागे लागलेल्या वाईट शक्ती त्या मडक्यात एकत्रित झाल्या आहेत. त्यांना काही प्रश्न विचारावे. होकारार्थी उत्तरासाठी मडके हलेल व नकारार्थी उत्तरासाठी स्थिर राहील. माझ्या कुटुंबियांना काही त्रास आहे का? मॅडमने विचारले आणि तत्काळ मडके हलू लागले. तुम्ही शांत रहावे. मी तुम्हाला कळकळीची विनंती केल्यास तुम्ही मान्य कराल कां? मडके स्थिर राहीले. यावर काही उपाय आहे कां? प्रश्नासरशी मडके हलू लागले. त्यावर बाबांचा चेहरा उजळला व त्यांनी मॅडमना धीर दिला व तिस-या पूजेचा उपाय सूचवला. मात्र त्यासाठी खर्च रू.५०००/- येणार होता. ह्यानंतर त्याच स्वरूपाच्या घटना होत राहिल्या, मॅडम पूजांसाठी पैसे खर्च करीत राहिल्या. बाबांनी दिलेल्या ताकीदीप्रमाणे डॉक्टर ज्यांना ह्या प्रकाराबद्दल सांगतील ती व्यक्ती मरणार असल्याने त्यांना ह्याबाबत पतीलाही सांगण्याची हिमंत होत नव्हती. अशाच एका प्रसंगी आपल्या छोटया मुलाला तर काही त्रास होणार नाही ना ह्या शंकेने भेडसावल्यावर बाबांच्या आसनाजवळील काळया कापडाची बाहुली नाचून, त्यांना मुलाची शाश्वती नसल्याची प्रचिती देऊन गेली. त्या दिवशी प्रथमच मॅडमनी, पतीच्या कपाटात व्यापाराच्या व्यवहारासाठी ठेवलेली रक्कम बाबांकडे सुपूर्द केली! त्यानंतर एकदा बाबांनी मॅडम पुढे पूजा करतांना हवेत हात फिरवून मॅडमच्या भोवती घोटाळणा-या शक्तींना दूर ढकलले व पार्टीशनच्या दारावर कोणीतरी आपटल्याचा आवाज झाला. त्या दिवशी घरातील दागिने गहाण ठेवण्यास सुरूवात केली. अशाच एका दिवशी बाबा नवरत्न बंगालीने, त्यांच्या कार्यालयात आलेले दुसरे गुरू बाबा मलीकजी ह्यांची ओळख करून देऊन ते महाज्ञानी असल्याचे व त्यांचे कार्यालय सायन येथे असल्याचे सांगितले. दरम्यानच्या काळात घरातील पैसे व दागिने नाहिसे होत असल्याने चिंतातूर झालेल्या पतीने, पोलिसांत तक्रार करायला पत्नी विरोध करते त्यामुळे पत्नीवरच संशय घेण्यास सुरूवात केली. शेवटी एक दिवस पत्नीच्या माहेरी चुनाभट्टी येथे तिला नेऊन सोडले व पैसे आणि दागिने ह्यांचे काय झाले हे सांगितल्याशिवाय घरी न येण्याची ताकीद दिली. **( क्रमशः भाग २ उद्याच्या अंकात)**

## १ Doctor Tips — सल्ला डॉक्टरचा



### अल्झायमर प्रतिबंध


आहारात फळे, भाजीपाला, मासे यांचे योग्य प्रमाण असल्यास काही प्रमाणात आजाराला प्रतिबंध होतो. ङ- मधुमेह, अतिरक्तदाब, रक्तात कोलेस्टेरॉलचे जास्त प्रमाण, धूम्रपान हे सर्व या आजाराची शक्यता वाढवतात.- मेंदूला चेतना देणारे खेळ, संगीत, सामाजिक कार्यक्रमात सहभाग, द्विभाषिक व्यवहार आदीमुळे आजाराला प्रतिबंध होतो.- रंगात वापरली जाणारी सॉल्वंट रसायनेही या आजाराला निमंत्रण देतात असे दिसते.

## २ Joke — विनोद




**गिऱ्हाईक :** मी एक चूक केली.
वेटर : काय झाले साहेब?
गिऱ्हाईक : तुला ङ्गटिपफ द्यायच्याऐवजी मी ती तुझ्या मालकाला दिली. **वेटर :** मोठीच चूक झाली साहेब. आता ती मला कधीही मिळणार नाही.

## ३ Message — संदेश



Santa's Morning workout
santa 2 doctor-apne kaha tha ki subah khelne se sehat thik rehti hai pr muje to koi fark nai pada?
doctor-konsa game khelteho?
santa-mobile mai snake wala .

## ४ Thought — सुविचार



राग जाळा नाही तर तो तुम्हाला जाळेल.


- अज्ञात

**संस्कृत सुभाषित**

**न स्वप्नेन जयेन्निद्रां, न कामेन जयेत् स्त्रियम।**
**नेन्धनेन जयेदग्निं, न पानेन जयेत् सुरा ।।**

अर्थ - अतिनिद्रेची इच्छा बाळगून निद्रेवर विजय मिळवता येत नाही. स्त्रीची कामवासना कामोपभोगाने शमत नाही, उलट ती वाढते, अग्नीत जळण घातल्याने तो जास्त भडकतो. अतिमद्यपानाची आसक्ती धरून मद्यपानाची इच्छा शमत नाही, उलट ती भडकते. भोगाचा अतिरेक केल्याने भोगाची इच्छा वाढतच जाते.

# मनोरंजक महाशब्दकोड्यांचा समाचार



### आडवे शब्द

१. रमेश देवबरोबरच्या या सिनेमात सीमा खलनायिका होती
६. ऐनवेळी कच खाणारा
११. न्याय
१२. सोशिकपणा
१४. नवरा
१५. अरण्य
१६. लोटी
१८. उगवत्या सूर्याचा देश
२१. च्या पुढे, समक्ष
२३. वेळेचा कमीत कमी भाग
२४. विरोध, प्रतिबंध
२७. पत, प्रतिष्ठा
२८. शंकराजवळचे चर्मवाद्य
२९. टप्प्याने टप्प्याने केलेला प्रवास
३२. अवधान, लक्ष
३३. भडक
३६. पळून जाणे
३९. कलावंत
४१. मत नोंदवण्याचा कालबाह्य कागद
४४. सोसाट्याचा वारा
४५. पवित्र
४६. संत ज्ञानेश्वरांनी लिहिलेली प्रार्थना
४९. परिस्थिती, कालाचे परिमाण
५२. सामान
५३. बस्तान
५४. मज्जाव
५६. आश्रय, थारा
५८. प्रकाश निर्माण करणारा सूर्य
६०. वाहणारी हवा
६१. जन्मदाते
६३. पाणी
६५. दक्ष
६६. यजमान
६७. आरोप, बालंट
६८. प्रयाण
६९. लोकमानस
७१. इच्छा, आकांक्षा (हिंदी)
७३. आपल्या उत्तर सीमेवरील एक राष्ट्र
७५. किंचित ओलावलेले (डोळे) (हिंदी)
७६. कामाचा उरका
७८. शिव
८०. अवाजवी
८२. भाजपा नेते 'नितीन ----'
८४. संथ
८५. स्तुतीची गाणी
८६. दु:खी होणे, वेदनेने ओरडणे

### उभे शब्द

१. लकब
२. खिशाला चाट
३. धास्ती, भीती
४. आपले राष्ट्रगीत
५. आलटापालट
७. खून
८. शिकारीसाठी हेरलेला प्राणी
९. डोसा
१०. शरीर, काया
१३. गलबताचे कापड
१७. भाकरी व इतर पदार्थांचा कुस्करा, दूधभाकरी
१९. वैमानिक (इंग्रजी)
२०. अंकुर
२२. रम्य, मनोहर
२५. दात
२६. अंधार
२७. फोडणीचे वरण
३०. प्रचंड
३१. जपजाप्य
३४. बगळा
३५. थेळ, सरळ
३७. लोकरीचा एक प्रकार
३८. लग्नकार्याचे लेखी आमंत्रण
४०. लबाडीचा हेतू
४२. सर्वस्वाने
४३. यापेक्षा 'आज' महत्त्वाचा
४५. पालनपोषण करणारा
४७. शोभणारा
४८. मृत्यूदेवता
५०. जयश्री गडकरचा चंद्रकांत गोखले यांच्या बरोबरचा गाजलेला चित्रपट
५१. नूतन
५२. तंबाखूचा असल्यास घातक
५५. मानबिंदू (ला.)
५७. कमळ
५८. दिवस
५९. कणीदार
६०. संसारातून अंग काढून घेणे
६१. सुखाच्या मोजमापाचे धान्य
६२. दाह, मत्सर
६४. मिरवणूक
६५. पत्राचा कालबाह्य झालेला मायना
६६. नम्रतेने मान खाली घालणे
६७अ. आल्या पावली, लगेच
७०. 'राही --- दुख की चिंता क्यों सताती है' (दोस्ती)
७२. थकवा
७४. सांभाळ
७७. खाली खेचणे, पराभूत करणे
७८. अधिकाराचे स्थान
७९. त्रासलेला
८०. शर्त
८२. माराची उठलेली खूण
८३. अस्वल

### आडवे उत्तर

१.अपराध ६.अवसानघातकी ११.दाद १२.सहनशीलता १४.धव १५.वन १६.गडवा १८.जपान २१.समोर २३.क्षण २४.हरकत २७.आब २८.डमरू २९.मजलदरमजल ३२.भान ३३.बटबटीत ३६.पलायन ३९.कलाकार ४१.मतपत्रिका ४४.वादळ ४५.पाक ४६.पसायदान ४९.कालमान ५२.माल ५३.जम ५४.मना ५६.निवारा ५८.दिवाकर ६०.वारा ६१.जनकजननी ६३.जीवन ६५.सावध ६६.नवरा ६७.किटाळ ६८.प्रस्थान ६९.जनमत ७१.तमन्ना ७३.नेपाळ ७५.नम ७६.रपाटा ७८.पवित्र ८०.अवास्तव ८२.गडकरी ८४.मंद ८५.स्तवन ८६.कळवळणे

### उभे उत्तर

१.अदा २.पदरमोड ३.धसका ४.जन गण मन ५.हलवाहलवी ७.वध ८.सावज ९.घावन १०.तन १३.शीड १७.भाकरकाला १९.पायलट २०.कोंब २२.रमणीय २५.रद २६.तम २७.आमटी ३०.जबरदस्त ३१.जपतप ३४.बक ३५.तडक ३७.नमदा ३८.पत्रिका ४०.कावा ४२.तनमनधनाने ४३.काल ४५.पालक ४७.साजरा ४८.यम ५०.मानिनी ५१.नवा ५२.मावा ५५.नाक ५७.राजीव ५८.दिन ५९.रवाळ ६०.वानप्रस्थ ६१.जव ६२.जळजळ ६४.वरात ६५.सा न वि वि ६६.नतमस्तक ६७अ.टाकोटाक ७०.मनवा ७२.मरगळ ७४.पालन ७७.पाडणे ७८.पद ७९.त्रस्त ८०.अट ८२.वळ ८३.रीस




## थोडक्यात/ संक्षिप्त

### केकेआरच्या खराब कामगिरीचा हिशोब चुकता करणार?

**मुंबई** –कोलकाता नाईट रायडर्स आणि पंजाब किंग्स यांच्यातील सामना पावसामुळे रद्द झाला असला, तरी अवघ्या ३.४ षटकांच्या खेळातच खेळींची एक मोठी उणीव समोर आली. आयपीएल २०२६ मधील १२व्या सामन्यात ईडन गार्डन्सवर टॉस जिंकून कोलकाताने प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला होता. मात्र केकेआरची सुरुवात अत्यंत निराशाजनक ठरली. सलामीवीर फिन ॲलन अवघ्या ६ धावांवर बाद झाला. त्यानंतर तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजीस आलेला कॅमेरॉन ग्रीन पुन्हा एकदा स्वस्तात माघारी परतला, तो दुसऱ्याच चेंडूवर झेलबाद झाला. दरम्यान, पावसामुळे सामना थांबल्यानंतर कॅमेरा शाहरुख खानवर गेला. तेव्हा तो संघाच्या णएध्सोबत गंभीर चर्चेत मग्न असल्याचे दिसून आले.

केकेआरचा कर्णधार अजिंक्य रहाणे आणि फिन ॲलन यांनी डावाची सुरुवात केली. मात्र दुसऱ्याच षटकात झेवियर बार्टलेट याने फिन ॲलनला बाद करत केकेआरला पहिला धक्का दिला.

### दारू पिऊन गाडी चालवणे पडले महागात; डेव्हिड वॉर्नरला अटक

**नवी दिल्ली,**–पाकिस्तान सुपर लीग (पीएसएल) दरम्यान एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. ऑस्ट्रेलियाचा दिग्गज फलंदाज डेव्हिड वॉर्नर एका कायदेशीर वादात अडकला आहे. वृत्तानुसार, वॉर्नरवर मद्यपान करून गाडी चालवल्याचा आरोप आहे आणि पोलिसांनी त्याला अटक केली होती. मात्र, नंतर त्याची सुटका करण्यात आली. ऑस्ट्रेलियाचा हा माजी सलामीवीर सध्या पाकिस्तान सुपर लीग (पीएसएल) २०२६ मध्ये कराची किंग्सचे कर्णधारपद भूषवत आहे. पीए–सएलमधील त्याच्या फ्रँचायझीच्या सामन्यांमध्ये काही दिवसांचे अंतर होते, त्यामुळे तो आपल्या कुटुंबासोबत वेळ घालवण्यासाठी ऑस्ट्रेलियाला गेला होता. पशुी.लो.र्री च्या वृत्तानुसार, डेव्हिड वॉर्नरवर मद्यपान करून गाडी चालवल्याचा आरोप ठेवण्यात आला आहे.

### बुमराह स्टाईल यॉर्कर! अर्जुन तेंडुलकरचा नवा अवतार पाहून मुंबई इंडियन्सही थक्क

**मुंबई,**–आयपीएल २०२६ मध्ये अर्जुन तेंडुलकर हा लखनऊ सुपरजाएंट्सचा भाग आहे. मागील अनेक वर्षापासून मुंबई इंडियन्सचा भाग राहिलेला अर्जुनला आयपीएल २०२६ पूर्वी लखनऊमध्ये ट्रेड करण्यात आलं. नव्या फ्रेंचायझीमध्ये आल्यापासून आतापर्यंत अर्जुनला प्लेईंग ११ मध्ये खेळण्याची संधी मिळालेली नाही, मात्रसराव सामन्यात तो आपल्या गोलंदाजीची कमाल दाखवत आहे. सोशल मीडियावरून एक व्हिडीओ समोर आली आहे. ज्यात ऑलराऊंडर अर्जुन तेंडुलकर एकापेक्षा जास्तवेळा घातकी यॉर्कर बॉल टाकताना दिसतोय. ऋषभ पंत आणि अब्दुल समद या दोघांनी अर्जुनच्या गोलंदाजीचा सामना केला. दोन्ही फलंदाजांना अर्जुनच्या अचूक यॉर्करचा सामना करताना संघर्ष करावा लागला.

### भारतीय राष्ट्रवादी पार्टी : पंजाब निवडणुकीपूर्वी नवज्योत सिद्धू यांची नव्या पक्षाची घोषणा

**चंदीगड,**–माजी क्रिकेटपटू आणि पंजाब काँग्रेसचे माजी अध्यक्ष नवज्योत सिंग सिद्धू यांच्या पत्नी डॉ. नवज्योत कौर सिद्धू यांनी नवीन पक्षाची स्थापना केली आहे. डॉ. नवज्योत कौर सिद्धू यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर एका पोस्टद्वारे नवीन पक्षाची घोषणा केली. दरम्यान, डॉ. नवज्योत कौर सिद्धू यांनी मभारतीय राष्ट्रवादी पार्टीफअसं नवीन पक्षाचं नाव असलेला एक फोटो पोस्ट केला आहे. ही एक बहुप्रतिक्षित घोषणा : याचबरोबर डॉ. नवज्योत कौर सिद्धू यांनी पोस्टमध्ये लिहिलं

# राजस्थानचा रॉयल धमाका! मुंबई इंडियन्सचा धुव्वा उडवला

**गुवाहाटी :** आयपीएलच्या १९ व्या मोसमात राजस्थान रॉयल्सने (ठरक्षींहरप ठ्रूश्री) आपला दबदबा कायम राखला आहे. मंगळवारी झालेल्या अटीतटीच्या लढतीत राजस्थानने बलाढ्य मुंबई इंडियन्सला २७ धावांनी धूळ चारली. प्रथम फलंदाजी करताना राजस्थानने मुंबईसमोर १५१ धावांचे माफक आव्हान ठेवले होते. मात्र, मुंबईची फलंदाजी या आव्हानासमोर पूर्णपणे कोलमडली. रियान परागच्या चाणाक्ष नेतृत्वाखाली राजस्थानच्या गोलंदाजांनी मुंबईला अवघ्या १२३ धावांत रोखले. मुंबईचे ९ फलंदाज स्वस्तात माघारी परतल्याने त्यांचा या स्पर्धेतील सलग दुसरा पराभव झाला आहे. राजस्थानने या विजयासह विजयाची हॅट्रिक साजरी केली असून, मुंबईला आता पुनरागमनासाठी कठोर मेहनत घ्यावी लागणार आहे.चरहरीरीहींर ऊशश्रळींशी ू ड्रू झेश्रळलश तशीळषळलरींळेप : यापुढे 'डिलिव्हरी बॉईज'ची तप–ासणी बंधनकारक; राज्य सरकारचा मोठा निर्णय

कामगार मंत्र्यांचे गृह विभागाला सर्वसमावेशक आराखडा तयार करण्याचे निर्देश मुंबई : ऑनलाईन प्लॅटफॉर्म, गिग आणि डिलिव्हरी क्षेत्रात काम करणाऱ्या ...

राजस्थानचे मुंबईसमोर १५१ धावांचे लक्ष्य




### पॉइंट्स टेबलमध्ये मोठी झेप!

गुवाहाटी येथील बारसपारा क्रिकेट स्टेडियमवर पावसाने बराच काळ खेळ रोखून धरला खरा, पण जेव्हा प्रत्यक्ष सामन्याला सुरुवात झाली, तेव्हा राजस्थान रॉयल्सच्या फलंदाजांनी मुंबई इंडियन्सच्या गोलंदाजांची अक्षरशः पळता भुई थोडी केली. पावसाच्या व्यत्ययामुळे तब्बल १६० मिनिटांचा वेळ वाया गेल्याने हा सामना प्रत्येकी ११ षटकांचा खेळवण्याचा निर्णय घेण्यात आला. रात्री १० वाजून १० मिनिटांनी सुरु झालेल्या या सामन्यात राजस्थानच्या फलंदाजांनी पहिल्या चेंडूपासूनच आक्रमक पवित्रा घेतला. सलामीवीर यशस्वी जैस्वालने मैदानाच्या चहूकडे फटकेबाजी करत मुंबईच्या गोलंदाजांना निष्प्रभ केले. त्याने नाबाद ७७ धावांची स्फोटक खेळी साकारली. त्याला तरुण फलंदाज वैभव सूर्यवंशीची उत्तम साथ मिळाली. वैभवने आक्रमक ३९ धावांचे योगदान देत राजस्थानला भक्कम स्थितीत नेऊन ठेवले. कर्णधार रियान परागने आपल्या घरच्या मैदानावर फटकेबाजीचा सराव सुरू ठेवत २० धावा जोडल्या. ध्रुव जुरेल अवघ्या २ धावांवर बाद झाल्याने काही काळ मुंबईला संधी मिळाली असे वाटले, पण जैस्वाल आणि शिमरॉन हेटमायरने (नाबाद ६) अधिक नुकसान होऊ न देता राजस्थानची धावसंख्या ११ षटकांत ३ बाद १५० पर्यंत पोहोचवली. मुंबई इंडियन्ससाठी अल्लाह गजनफरने २ गडी बाद करत थोडा प्रतिकार केला, तर अनुभवी शार्दूल ठाकूरने वैभव सूर्यवंशीची महत्त्वाची विकेट मिळवली. मात्र, पावसामुळे ओल्या झालेल्या चेंडूवर नियंत्रण मिळवणे मुंबईच्या गोलंदाजांना कठीण गेले. आता मुंबईसमोर विजयासाठी ११ षटकांत १३.७२ च्या सरासरीने १५१ धावांचे डोंगराएवढे आव्हान आहे.

**मुंबईची फलंदाजी पत्त्यासारखी कोसळली**

१५१ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना मुंबई इंडियन्सच्या दिग्गज फलंदाजांनी सपशेल नांगी टाकली. सलामीवीर रोहित शर्मा (५), सूर्यकुमार यादव (६) आणि रायन रिकेल्टन (८) हे स्वस्तात माघारी परतले, तर कर्णधार हार्दिक पंड्यालाही केवळ ९ धावाच करता आल्या. मुंबईच्या टॉप ऑर्डरमधील एकाही फलंदाजाला दुहेरी आकडा गाठता आला नाही, ज्यामुळे मुंबईचा डाव सुरुवातीलाच गडगडला. मध्यफळीत नमन धीर आणि शेरफेन रुदरफोर्ड यांनी प्रत्येकी २५ धावांची खेळी करून थोडा प्रतिकार केला, मात्र इतर फलंदाजांची साथ न मिळाल्याने मुंबईला ११ षटकांत ९ विकेट्स गमावून केवळ १२३ धावांपर्यंतच मजल मारता आली.

## वेंगसरकर यांच्या मार्गदर्शनाखाली एमसीएचे उच्च कामगिरी शिबिर

मुंबई : मुंबई क्रिकेट असोसिएशन (एमसीए) तर्फे आयोजित उच्च कामगिरी शिबिराचा सोमवारी शुभारंभ करण्यात आला. भारताचे माजी कर्णधार दिलीप वेंगसरकर यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू झालेल्या या शिबिरात आगामी स्पर्धांसाठी खेळाडूंना सर्वांगीण प्रशिक्षण दिले जाणार आहे.या तीन आठवड्यांच्या शिबिरासाठी पुरुष आणि महिला गटातील प्रत्येकी २५ अशा एकूण ५० उत्कृष्ट खेळाडूंची निवड करण्यात आली आहे. ही निवड भारतीय क्रिकेट नियामक मंडळ (बीसी–सीआय)च्या विविध स्पर्धांमधील सातत्यपूर्ण कामगिरीच्या आधारे करण्यात आली आहे. उद्योन्मुख खेळाडूंना संधी देणे आणि मुंबईच्या क्रिकेट पायाभूत सुविधांना अधिक बळकटी देणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.या शिबिरात माजी क्रिकेटपटू निलेश कुलकर्णी आणि समीर दिघे यांच्याकडून विशेष कौशल्याधारित प्रशिक्षण दिले जाणार आहे. फलंदाजी, गोलंदाजी आणि यष्टिरक्षणातील बारकावे सुधारण्यासाठी ते खेळाडूंना मार्गदर्शन करणार आ–हेत. तसेच क्रीडा मानसशास्त्र, पोषणतज्ज्ञांचे मार्गदर्शन, आर्थिक नियोजन आणि झोप व्यवस्थापन यांसारख्या विषयांवरही तज्ज्ञांची सत्रे आयोजित करण्यात आली आहेत, ज्यामुळे खेळाडूंचा सर्वांगीण विकास साधला जाईल.

एमसीएचे अध्यक्ष अजिंक्य नाईक यांनी सांगितले की, या शिबिरातून भविष्यातील अष्टपैलू क्रिकेटपटू घडवण्याचा उद्देश आहे. हे शिबिर आगामी यूके दौर्‍यासाठी खेळा–डू निवडीचे महत्त्वपूर्ण व्यासपीठ ठरणार असून, उत्कृष्ट कामगिरी करणार्‍या खेळाडूंना संघात स्थान मिळण्याची संधी मिळणार आहे.

## तीन दिवसांत ६ संचालकांचे राजीनामे

**ढाका :** बांगलादेश क्रिकेट बोर्ड मध्ये मोठी उलथापालथ सुरू असून अवघ्या तीन दिवसांत सहा संचालकांनी राजीनामे दिल्याने संघटनेत खळबळ उडाली आहे. सानियान तनीम, मेहराब आलम, फैयाजुर रहमान आणि मंजूरुल आलम यांनी पद सोडले, तर यापूर्वी यासिर मोहम्मद आणि फैसल आशिक यांनीही राजीनामा दिला होता. आणखी काही सदस्यही पद सोडण्याच्या तयारीत असल्याची चर्चा आहे. या पार्श्वभूमीवर बीसीबीचे अध्यक्ष अमिनुल इस्लाम यांनी ठाम भूमिका घेत सर्वजण गेले तरी मी शेवटपर्यंत पदावर राहणार असे स्पष्ट केले. त्यांनी काही बाह्य शक्तींवर हस्तक्षेपाचा आरोप करत कामात अडथळे येत असल्याचे सांगितले. दरम्यान, बोर्डातील अंतर्गत कलह आणि निवडणूक प्रक्रियेवरील वादामुळे परिस्थिती अधिकच गुंतागुंतीची झाली आहे.

## ईडन गार्डन्सवर क्रिकेट खेळावर पावसाची खेळी; कोलकाता–पंजाब सामना स्थगित



मुंबई : आयपीएलचा १२वा सामना कोलकाता येथील ईडन गार्डन्स स्टेडियमवर कोलकाता नाईट रायडर्स (केकेआर) आणि पंजाब किंग्स (पीबीकेएस) यांच्यात खेळला जात आहे. कोलकाताने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला आहे. पावसामुळे खेळ थांबवण्यात आला आहे. कोलकाताने ३.४ षटकांत २ गडी बाद २५ धावा केल्या आहेत. कर्णधार अजिंक्य रहाणे आणि अंगक्रिश रघुवंशी क्रीजवर आहेत. दुसर्‍या षटकात झेवियर बार्टलेटने कॅमेरॉन ग्रीन (४ धावा) आणि फिन लन (६ धावा) यांना बाद केले.

या हंगामातील केकेआर आणि पीबीकेएस यांच्यातील हा तिसरा सामना आहे. कोलकाताने दोन्ही सामने गमावले आहेत. पंजाबने आपले दोन्ही सलामीचे सामने जिंकले आहेत. संघाने गुजरात आणि चेन्नईला पराभूत केले. पावसामुळे या सामन्यात व्यत्यय येऊ शकतो.

नाणेफेकीवेळी केकेआरचा कर्णधार अजिंक्य रहाणे यांनी याबाबत माहिती दिली. त्यांनी सांगितले की, वरुण चक्रवर्ती मागील सामन्यात झेल घेताना जखमी झाला असून त्यामुळे त्याला विश्रांती देण्यात आली आहे. तर सुनील नरेन आज–ारी असल्याने तोही संघाबाहेर आहे.या दोन्ही खेळाडूंच्या अनुपस्थितीत केकेआरने प्लेईंग इलेव्हनमध्ये बदल करत रोव्हमन पॉवेल आणि नवदीप सैनी यांचा समावेश केला आहे. सलग दोन पराभवानंतर संघाने हे बदल करणे आवश्यक असल्याचेही रहाणे यांनी नमूद केले.

## एआयएफएफकडून माजी फुटबॉलपटू गिल्बर्टसन संगमा यांना श्रद्धांजली




**नवी दिल्ली :** अखिल भारतीय फुटबॉल महासंघ (एआयएफएफ) ने भारताचे माजी फॉरवर्ड गिल्बर्टसन संगमा यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला आहे. 'आसामचे पेले' म्हणून ओळखले जाण–ारे संगमा यांचे ३ एप्रिल रोजी गुवाहाटी येथे निधन झाले. ते ७० वर्षांचे होते.संगमा यांनी १९७५ मध्ये आंतरराष्ट्रीय स्तरावर भार–ताचे प्रतिनिधित्व केले. जकार्ता येथे मराह हलीम चषक स्पर्धेत इंडोनेशियाविरुद्ध त्यांनी राष्ट्रीय संघात पदार्पण केले होते. त्यांनी भारतासाठी एकूण तीन सामने खेळ–ले.देशांतर्गत फुटबॉलमध्येही त्यांची कामगिरी उल्लेखनीय राहिली. १९७२ ते १९८० या काळात त्यांनी संतोष ट्रॉफीत आसाम संघाकडून सातत्यपूर्ण कामगिरी करत चार गोल नोंदवले. क्लब स्तरावर त्यांनी आसाम पो–लीस संघाचे प्रतिनिधित्व केले आणि १९८१ मध्ये बार्दोलोई ट्रॉफी जिंकणार्‍या संघाचा ते महत्त्वाचा भाग होते. अंतिम सामन्यातील त्यांच्या निर्णायक गोलमुळे संघाला विजेतेपद मिळाले होते. एआयएफएफने निवेदनात म्हटले की, भारतीय फुटबॉल समुदायासोबत आम्ही संगमा यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त करतो आणि त्यांच्या यो–गदानाला आदरांजली अर्पण करतो. संगमा यांना आसाममधील सर्वोत्तम फुटबॉलपटूंपैकी एक मानले जाते.

## गुवाहाटीमध्ये पाऊस पडणार? समोर आली मोठी अपडेट!

गुवाहाटी,–आयपीएल २०२६ मध्ये सोमवारचा कोलकाता आणि पंजाब यांच्यातला सामना पावसामुळे रद्द झाला. यंदाच्या मोसमात पहिल्यांदाच एखादा सामना पावसामुळे खेळवला गेला नाही, त्यानंतर आता मंगळव–ारी राजस्थान रॉयल्सचा सामना मुंबई इंडियन्सविरुद्ध होणार आहे. गुवाहाटीच्या बरसापारा क्रिकेट स्टेडियममध्ये ही लढत होईल. आयपीएलच्या या मोसमात राजस्थानने आतापर्यंत त्यांचे दोन्ही सामने जिंकले आहेत. राजस्थान–मुंबईच्या सामन्याचा पिच रिपोर्टबरसापारा क्रिकेट स्टेडियमची खेळपट्टी बॅटिंगला म दत करणारी मानली जाते, त्यामुळे या सामन्यात फोर आणि सिक्सचा पाऊस पडून मोठ्या रन व्हायची अपेक्षा आहे.

## माण–हिंजवडी येथे टी–२० प्रीमियर लीगफ्चे उद्घाटन

पिंपरी : पिंपरी–चिंचवड शहर क्रिकेट असोसिएशनच्या वतीने आयोजित 'टी–२० प्रीमियर लीग' क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन माण–हिंजवडी येथील फोर स्टार क्रीडांगणावर सोमवारी उत्सा–हपूर्ण वातावरणात पार पडले. मावळ लोकसभा मतदारसंघाचे खासदार श्रीरंग बारणे यांच्या हस्ते या स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी असोसिएशनचे अध्यक्ष जगदीश शेट्टी यांनी बारणे यांचा सत्कार करून खेळाडूंची ओळख करून दिली. तसेच स्पर्धेच्या करंडकाचे अनावरण करण्यात आले. या स्पर्धेत बन्ट्स वॉरियर, प्रतीक रॉयल्स, स्पोर्ट स्टोरीज एव्हेंजर्स, सोनिगरा सुपर किंग्स, विश्व टायगर्स, सह्याद्री किंग्स, आसवानी डेअरडेव्हिल्स आणि मोरे पाटील पॅंकर्स हे आठ संघ सहभागी झाले आहेत. उद्घाटनप्रसंगी बोलताना बारणे यांनी सांगितले की, अशा स्पर्धांमुळे स्थानिक खेळाडूंना आपले कौशल्य दाखवण्याची संधी मिळते आणि क्रीडा संस्कृतीला चालना मिळते. स्पर्धा जिंकणे महत्त्वाचे असले तरी खे–ळातून शिस्त, संघभावना आणि आत्मविश्वास विकसित होतो, असे त्यांनी नमूद केले. असोसिएशनचे अध्यक्ष जगदीश शेट्टी यांनीही खेळाडूंना उत्तम सुविधा उपलब्ध असून त्याचा योग्य वापर करून प्रगती साधावी, असे आवाहन केले. सदस्य प्रदीप वाघ यांनी स्पर्धेच्या आयोजनामागील उद्दिष्ट स्पष्ट केले, तर सचिव राजू कोतवाल यांनी खेळामुळे मैत्री आणि शिस्त वाढते, असे सांगितले. स्पर्धेतील पहिल्या सामन्यात प्रतीक रॉयल्सने १६.५ षटकांत १०७ धावा केल्या. प्रत्युत्तरात बन्ट्स वॉरियरने ११ षटकांत बिनबाद १०८ धावा करत १० गडी राखून दणदणीत विजय मिळवला. गणेश कलेल याला सामनावीर पुरस्काराने गौरविण्यात आले.




# मुंबई इंडियन्स राजस्थानमध्ये ५-५ ओव्हरचा सामना...पण मॅच किती वाजता

मुंबई,–आयपीएलमध्ये आज गुवाहाटीच्या बारसपारा स्टेडिएमवर मुंबई इंडियन्स आणि राजस्थान रॉयल्स यांच्यात सामना खेळवला जाणार आहे. पण मागच्या दोन तासापासून गुवाहाटीच्या मैदानावर पाऊस पडस असल्याने हा सामना सूरूच होऊ शकला नाही. पण आता जवळपास ५– ओव्हरचा सामना होण्याची शक्यता आहे. असे जर झाले तर किती वाजता मॅच सुरु होणार आहे? हे जाणून घेऊयात.

खरं तर राजस्थान रॉयल्स आणि मुंबई इंडियन्स यांच्यात संध्याकाळी ७ वाजता टॉस होणे अपेक्षित होते. पण पावसामुळे टॉसच होऊ शकला नाही. आता जवळपास दोन तासाचा कालावधी उलटून गेला आहे. तरी देखील टॉस झालेला नाही.मैदानात प्रचंड पाऊस पडतो त्यामुळे प्रचंड अडचणी येत आहेत.

मैदान सतत पाऊस पडत असल्यामुळे सामन्याची वेळ देखील कमी होत चालली आहे. त्यात ८.४० सामन्याचे ओव्हर घटण्यास सूरूवात झाली आहे.त्याचसोबत आता साम न्याचा कटऑफ टाईमही जाहीर करण्यात आला आहे. १०.५६ हा सामन्याचा कट ऑफ टाईम असणार आहे.जर या वेळेच्या नंतर सामना सूरू झाला तर ५–५ ओव्हरचा सामना खेळवला जाण्याची शक्यता आहे.

सध्या पाऊस थांबल्याचे चित्र आहे. अंपायर देखील मैदानात आले आहेत आणि क्युरेटरशी चर्चा करत आहेत.तसेच ग्राऊंडस्फाफने देखील मैदानावरील कव्हर्स हटवण्यास सूरूवात केली आहे. ही गोष्ट पाहता मैदानात लवकरच टॉस होऊन सामन्याला सूरूवात होण्याची शक्यता आहे. जर आता लगेचच सामना सूरू झाला तर जास्तीत जास्त १० ओव्हरचा सामनाही खेळवण्याची शक्यता आहे.याबाबत लवकरच अपडेट मिळणार आहेत.



मैदानावरील कव्हर काढताना अनेक ठिकाणी पाण्याची डबके बनली आहेत. ही बाब चांगली नाही. त्यामुळे मैदानाची खेळपट्टी सुकवण्यासाठी मैदान कर्मचाऱ्यांना आणखीच जास्त वेळ लागेल.पण राजस्थान रॉयल्सच्या कोचिंग आणि सपोर्ट स्टाफमधील अनेक सदस्य आधीच मैदानावर उपस्थित आहेत. अखेर, झाकणांवर साचलेले पाणी काढून टाकण्यासाठी मसुपर सोपर्सफ फिरवले जात आहेत,फफ अशी माहिती आयुषने दिली

## आशियाई बॉक्सिंगमध्ये प्रीतीची दमदार कामगिरी; अंतिम फेरीत

**उलानबातर (मंगोलिया) :** आशियाई बॉक्सिंग ऑलिंपियनशिप स्पर्धेत भारताच्या प्रीती पवार हिने शानदार कामगिरी करत अंतिम फेरीत प्रवेश केला. उपांत्य फेरीत तिने कोरियाच्या ऑलिम्पिक कांस्यपदक विजेत्या अजी इमचा ५–० असा एकतर्फी पराभव करत आ–पली ताकद दाखवून दिली.आशियाई क्रीडा स्पर्धेतील कांस्यपदक विजेती प्रीतीने तीनही फेर्यांत आक्रमक खेळ करत प्रतिस्पर्ध्याला कोणतीही संधी दिली नाही. अंतिम फेरीत तिचा सामना चायनीज तैपेईच्या अनुभवी बॉक्सर हुआंग शियाओ–वेनशी होणार आहे, जी तीन वेळा विश्वविजेती राहिली आहे.दरम्यान, भारताच्या इतर खेळाडूंमध्ये प्रिया आणि अरुंधती चौधरी यांनीही उपांत्य फेरीतील सामने जिंकत अंतिम फेरीत प्रवेश केला. अरुंधतीने ७० किलो गटात उझबेकिस्तानच्या ओइशा तोइरोवाला ४–१ ने पराभूत केले.मात्र, दोन वेळची विश्वविजेती निखत झरीन हिला चीनच्या वू यु हिच्याकडून ५–० ने पराभव पत्करावा लागला.

# ‘माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव’ राज्यव्यापी अभियानाचा मुख्यमंत्र्यांच्या हस्ते शुभारंभ

## उपमुख्यमंत्री, आरोग्य मंत्र्यासह मंत्रिमंडळाची उपस्थिती

**मुंबई/प्रतिनिधी :** जागतिक आरोग्य दिनाच्या निमित्ताने महाराष्ट्राच्या ग्रामीण भागाचा चेहरामोहरा बदलण्यासाठी आणि ग्रामीण जनतेला दर्जेदार आरोग्य सुविधा त्यांच्या उंबरठ्यावर उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने राज्य शासनाच्या ‘‘माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव’’ या महत्त्वाकांक्षी अभियानाचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज शुभारंभ करण्यात आला.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांच्यासह मंत्रिमंडळातील मंत्री उपस्थित होते.



सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी अभियानाविषयी मंत्रिमंडळाला माहिती दिली. अभियानाविषयी माहिती देण्यात येणाऱ्या व्हिडिओ आणि पुस्तिकेचे प्रकाशनही मान्यवरांच्या हस्ते यावेळी करण्यात आले.

राज्य शासनाने ‘माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव’ या अभियानाच्या माध्यमातून ग्रामीण महाराष्ट्रातील आरोग्य व्यवस्था अधिक सक्षम, रोगमुक्त आणि स्वयंपूर्ण करण्याचा संकल्प केला आहे. लोकसहभागातून ही मोहीम व्यापक आरोग्य चळवळ म्हणून उभी राहावी, हा शासनाचा मानस असून, गावपातळीपासून राज्यस्तरापर्यंत आरोग्य सेवांचे सक्षमीकरण करण्यावर भर देण्यात येणार आहे.

या अभियानाचे वैशिष्ट्य म्हणजे उपचारांपेक्षा प्रतिबंधात्मक उपाययोजनांवर अधिक भर देणे. स्वच्छता, शुद्ध पाणीपुरवठा, सांडपाणी व्यवस्थापन, पोषण, तसेच संसर्गजन्य व असंसर्गजन्य आजारांवर नियंत्रण यासारख्या मूलभूत घटकांवर लक्ष केंद्रित करून ग्रामीण नागरिकांच्या आरोग्यदायी जीवनशैलीला प्रोत्साहन दिले जाणार आहे. माता-बाल आरोग्य, मानसिक आरोग्य आणि बदलत्या जीवनशैलीशी निगडित आजारांनाही या मोहिमेत विशेष स्थान देण्यात आले आहे.

या अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्य, विभाग, जिल्हा आणि ग्रामपंचायत स्तरावर समित्यांची स्थापना करण्यात आली असून, ठरावीक निकषांनुसार उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या गावांना ‘‘आरोग्यसंपन्न गाव’’ म्हणून गौरविण्यात येणार आहे. यासाठी राज्य शासनाने मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध करून दिला असून, ग्रामपंचायत, जिल्हा परिषद, पंचायत समिती तसेच आरोग्य संस्थांना ६५.२५ कोटी रुपयांचे पुरस्कार देण्यात येणार आहेत.

‘‘माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव’’ हे अभियान केवळ योजना नसून एक लोकचळवळ आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून ग्रामीण महाराष्ट्रातील आरोग्याचा स्तर उंचावून निरोगी, सशक्त आणि समृद्ध समाज घडविण्याचा मार्ग मोकळा होणार असल्याचा विश्वास यावेळी आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर आणि आरोग्य राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी व्यक्त केला.

## मालेगाव येथील राष्ट्र सेवा दलाच्या शिबीरात सहभागी व्हा, राष्ट्र सेवा दलाचे जिल्हाध्यक्ष पांडुरंग देडे यांचे आवाहन

**लातूर/प्रतिनिधी :** राष्ट्र सेवा दलाचे मैदानी शिक्षक-प्रशिक्षक वैचारिक शिबीर मालेगाव जि. नाशिक येथे युवक-युवतीसाठी १० ते १२ एप्रिल दरम्यान आयोजित करण्यात आले आहे. या शिबिरात लातूर जिल्ह्यातील १७ वर्षापुढील युवक-युवतीनी सहभागी व्हावे, असे आवाहन राष्ट्र सेवा दलाचे लातूर जिल्हाध्यक्ष पांडुरंग देडे यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे. सदर शिबीर मालेगाव कॅम्प, साने गुरुजी रुग्णालय, पंचायत समिती समोर येथे होणार आहे. राष्ट्र सेवा दलाच्या विचाराची आज खरी गरज असल्याने या शिबिरात लातूर जिल्ह्यातून नव्या सेवा दल सैनिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन राष्ट्र सेवा दलाचे लातूर जिल्हाध्यक्ष पांडुरंग देडे, सचिव हरिदास तम्मेवार, कार्याध्यक्ष डॉ. गणेश गोमारे यांनी केले आहे. ज्या सेवा दल सैनिकांना शिबिरासाठी जायचे आहे, त्यांनी ९८६०४६४२८६ या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा, असे कळवण्यात आहे.

## उन्हाळ्यात पक्ष्यांसाठी पाण्याची सोय हाकेतांडा शाळेचा अभिनव उपक्रम



**रेणापूर/प्रतिनिधी :** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा हाकेतांडा, ता. रेणापूर, जिल्हा लातूर, शाळेत उन्हाळ्याच्या तीव्र उकाड्यात पशु-पक्ष्यांना पाण्याची टंचाई भासू नये यासाठी शाळेचे मुख्याध्यापक गणेश सावळकर, उपक्रमशिल शिक्षक जाकिर शेख,विशेष सहाय्यक शिक्षक बालाजी सावळकर,व विद्यार्थ्यांनी एकत्र येऊन एक स्तुत्य उपक्रम राबविला आहे.शाळेच्या परिसरात तसेच गावातील विविध ठिकाणी माठ, मडकी, एळणी व खापरांमध्ये पाणी भरून ठेवण्यात आले आहे, ज्यामुळे पक्ष्यांना सहज पाणी पिण्यास मिळत आहे. विद्यार्थ्यांनी स्वतः पुढाकार घेऊन ही व्यवस्था केली असून, दररोज पाणी भरून स्वच्छता राखण्याची जबाबदारीही घेतली आहे.या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाबद्दलची जाणीव व प्राणी-पक्ष्यांविषयीची संवेदनशीलता वाढत असल्याचे शिक्षकांनी सांगितले. रेणापूर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी सुमित जाधव, गटशिक्षणाधिकारी कृष्णा भराडिया, विस्तार अधिकारी सुदर्शन लहाने, केंद्रिय मु.अ. गोपाळ पडिले, अध्यक्ष त्र्यंबक राठोड, संजय चव्हाण, गावकऱ्यांनीही या उपक्रमाचे कौतुक केले असून, इतरांनीही अशा प्रकारे पुढाकार घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे.

## स्मशानभूमीत राहणाऱ्या कुटुंबीयाच्या चेहऱ्यावर रोटरी क्लबने उमलवले हास्य




**लातूर/प्रतिनिधी :** खाडगाव रोड येथील स्मशानभूमीत नांदेड येथील मसनजोगी समाजातील एक कुटुंब गेल्या अनेक दिवसांपासून वास्तव्यास आहे असे उपप्राचार्य तथा रोटरियन डॉ दिलीप नागरगोजे यांच्या लक्षात आले हे कुटुंब स्मशानभूमीत येणाऱ्या मृतदेहांवर अंत्यसंस्कार करणे, परिसराची स्वच्छता राखणे तसेच झाडांना पाणी देणे अशी विविध कामे हे कुटुंब प्रामाणिकपणे पार पाडत आहे. त्यांच्यासाठी आपण काहीतरी मदत करावी ही कल्पना रोटरीचे अध्यक्ष श्री जकी खान यांच्या कडे व्यक्त केले त्यांनी याला तात्काळ मंजुरी देऊन रूपये दहा हजाराचा निधी उपलब्ध केला.उपप्राचार्य डॉ नागरगोजे व प्रा.डॉ गोपाल बाहेती यांनी या कुटुंबाला मार्केटमध्ये बोलावून कपडे खरेदी केले.अत्यंत साध्या परिस्थितीत जगणाऱ्या या कुटुंबात पती-पत्नी, आई, भाऊ आणि तीन लहान मुले असून ते दिवस-रात्र स्मशानभूमीतच वास्तव्य करतात. कठीण परिस्थितीतही समाजसेवेचे कार्य करणाऱ्या या कुटुंबाच्या आयुष्यात थोडा आनंद यावा, त्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलावे या उद्देशाने रोटरी क्लब लातूरच्या वतीने त्यांना संपूर्ण कुटुंबासाठी कपड्यांचे वाटप करण्यात आले.या प्रसंगी रोटरी क्लबचे अध्यक्ष जकी खान कायमखानी, उपप्राचार्य तथा रोटेरियन डॉ. दिलीप नागरगोजे, रोटेरियन प्रा.डॉ. संदीपान जगदाळे, रोटेरियन प्रा.डॉ. गोपाल बाहेती आदी मान्यवर उपस्थित होते. समाजातील वंचित घटकांप्रती संवेदनशीलता जपणारा हा उपक्रम प्रेरणादायी ठरला असून, या मदतीमुळे त्या कुटुंबियांच्या चेहऱ्यावर खऱ्या अर्थाने आनंदाचे हास्स उमटले.

# अमृत संस्थेमार्फत ८ ते २५ एप्रिल दरम्यान लक्षित गटातील कुटुंबांचे सर्वेक्षण

**लातूर/प्रतिनिधी :** महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) या महाराष्ट्र शासनाच्या स्वायत्त संस्थेमार्फत राज्यातील खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांच्या सर्वांगीण विकासासाठी अमृत परिवार सर्वेक्षण अभियान राबविण्यात येत आहे. लातूरसह महाराष्ट्रातील सर्व ३६ जिल्ह्यांमध्ये ८ ते २५ एप्रिल २०२६ या कालावधीत हे सर्वेक्षण केले जाणार आहे.

ज्या खुल्या प्रवर्गातील जातींना कोणत्याही स्वतंत्र शासकीय विभाग, संस्था किंवा महामंडळामार्फत योजनांचा लाभ मिळत नाही, अशा घटकातील युवक-युवती व उमेदवारांच्या प्रगतीसाठी अमृत कार्यरत आहे. या संस्थेमार्फत व्यक्तिमत्व विकास, औद्योगिक व प्रगत कौशल्य विकास, उच्च शिक्षणासाठी अर्थसाह्य, स्पर्धा परीक्षा प्रोत्साहन आणि वैयक्तिक व्याज परतावा योजना (उद्योग-व्यवसाय वृद्धीसाठी) यांसारख्या विविध कल्याणकारी योजना राबविल्या जातात.

सध्या अमृतच्या लक्षित गटामध्ये प्रामुख्याने ब्राह्मण, सिंधी, हिंदू मारवाडी, गुजराती, पटेल, राजपूत, राजपुरोहित, हिंदू नेपाळी, बनिया, कम्मा, कायस्थ, अय्यंगार, नायर, नायडू, पाटीदार, बंगाली, भूमिहार, येलमार, ठाकूर, त्यागी, सेनगूनथर, जाट, कानबी, कोमटी आणि वैश्य या २५ जातींचा समावेश आहे. सर्वेक्षणाअंती या संख्येत वाढ होण्याची शक्यता आहे.

सर्वेक्षणाचे स्वरूप आणि हेतू

या अभियानाद्वारे लक्षित गटातील कुटुंबांची संख्या निश्चित करणे, त्यांच्या अपेक्षा जाणून घेणे आणि स्थानिक संसाधने व कौशल्यानुसार नवीन योजना तयार करणे, असा दुहेरी हेतू आहे. सर्वेक्षणादरम्यान गोळा केलेल्या माहितीच्या आधारे भविष्यात नवीन मूल्यवर्धित योजना तयार करण्यात येतील. तसेच, नोंदणीकृत संपर्क क्रमांकाच्या माध्यमातून लाभार्थ्यांना वेळोवेळी योजनांची माहिती दिली जाणार आहे.

८ ते २५ एप्रिल या कालावधीत अमृत संस्थेचे प्रतिनिधी प्रत्यक्ष संपर्क साधणार आहेत. तसेच लक्षित गटातील सामाजिक संस्था, संघटना, मंडळे आणि प्रतिष्ठित व्यक्तींनी स्वतःहून आपल्या समाजाची व कुटुंबाची माहिती अमृतच्या जिल्हा किंवा विभागीय व्यवस्थापकांकडे नोंदवावी, असे आवाहन करण्यात आले आहे. या कालावधीत गरज भासल्यास सर्वेक्षणाची मुदत वाढवण्यात येईल.

जास्तीत जास्त नागरिकांनी या नोंदणी मोहिमेत सहभागी होऊन शासकीय योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन लातूरचे जिल्हा व्यवस्थापक शुभम मुळजकर यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी अमृत कार्यालय, मयुरेश्वर अपार्टमेंट, पितृछाया बिल्डिंग, पहिला मजला, सिग्नल कॅम्प, विद्यानगर, लातूर (भ्रमणध्वनी: ७३९१०६५४७०) येथे संपर्क साधण्याचे आवाहन त्यांनी केले आहे.

## लातूर येथे ९ एप्रिल रोजी जागेवरच निवड संधी रोजगार मेळाव्याचे आयोजन

**लातूर/प्रतिनिधी :** जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र आणि मॉडेल करिअर सेंटर, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने पंडित दीनदयाल उपाध्याय जागेवरच निवड संधी (प्लेसमेंट ड्राईव्ह) मोहिमेचे आयोजन करण्यात आले आहे. हा रोजगार मेळावा दिनांक ९ एप्रिल २०२६ रोजी सकाळी १० वाजता जिल्हा कौशल्य विकास कार्यालयाच्या परिसरात होईल.

या मेळाव्यामध्ये नामांकित आस्थापना व उद्योजक सहभागी होणार असून १० वी, १२ वी, पदवीधर, पदव्युत्तर, आय.टी.आय. आणि डिप्लोमाधारक उमेदवारांना रोजगाराच्या विविध संधी उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. इच्छुक उमेदवारांनी शैक्षणिक कागदपत्रे, स्वतःचा रिझ्युम आणि पासपोर्ट फोटोच्या तीन प्रतींसह जिल्हा क्रीडा संकुल समोरील शासकीय तंत्र प्रशाला केंद्र येथे स्वखर्चाने मुलाखतीसाठी उपस्थित राहावे. लातूर जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगार व नोकरी इच्छुक उमेदवारांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन सहायक आयुक्त नि. ना. सूर्यवंशी यांनी केले आहे.

## महात्मा बसवेश्वर कनिष्ठ महाविद्यालयातील विज्ञान शाखेचा शिक्षक-विद्यार्थी-पालक सुसंवाद मेळावा उत्साहात संपन्न

**लातूर/प्रतिनिधी :** महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूर द्वारा संचलित महात्मा बसवेश्वर कनिष्ठ महाविद्यालयातील विज्ञान शाखेचा विद्यार्थी-शिक्षक-पालक मेळावा व्होकेशनल सभागृहात उत्साहात संपन्न झाला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो.डॉ.सिद्राम डोंगरगे हे होते तर विचारमंचावर मुख्य समन्वयक प्रो.डॉ.नल्ला भास्कर रेड्डी, उपप्राचार्य प्रा.नितीन वाणी, विज्ञान बोर्ड समन्वयक डॉ.गुणवंत बिरादार आणि प्रा.केशव सूर्यवंशी यांची उपस्थिती होती.

या कार्यक्रमाची सुरुवात जगतज्योती महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून दीप प्रज्वलनाने झाली.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना डॉ.गुणवंत बिरादार म्हणाले की, विद्यार्थी भावी शिक्षणाच्या दृष्टिकोनातून बोर्ड परीक्षेमध्ये उत्तम टक्केवारीने उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. अभियांत्रिकी प्रवेशासाठी ग्रुपिंगची अत्यंत आवश्यकता असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी बोलताना उपप्राचार्य प्रा.नितीन वाणी म्हणाले की, -, आणि परीक्षेचे महत्व आणि त्याची तयारी करताना वेळेचे नियोजन, विषय निहाय स्वतंत्र वैयक्तिक वेळापत्रक विद्यार्थ्यांनी बनवायला शिकले पाहिजे. तसेच अभ्यास करण्याची सवय मुलांनी स्वतः लाच लावून घेतली पाहिजे.

## दयानंद विज्ञान महाविद्यालयातील सूक्ष्मजीवशास्त्र विभागातर्फे ‘ताक’ या भारतीय पारंपरिक पेयाबद्दल सूक्ष्मजीवशास्त्रीय दृष्टिकोनातून जनजागृती मोहीम



**लातूर/प्रतिनिधी :** येथील दयानंद शिक्षण संस्था संचलित, दयानंद विज्ञान महाविद्यालयातील सूक्ष्मजीवशास्त्र विभागातर्फे दि.०६ एप्रिल २०२६ वार सोमवार रोजी मायक्रोबायॉलॉजिस्ट्स सोसायटी, इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने ताक या भारतीय पारंपरिक पेयाबद्दल सूक्ष्मजीवशास्त्रीय दृष्टिकोनातून जनजागृती मोहिमेचे आयोजन करण्यात आलेले होते. या मोहिमेचा मुख्य उद्देश हा, ताक या भारतीय पारंपरिक पेयाबद्यल आध्यात्मिक,सांस्कृतिक व वैज्ञानिक महत्त्व सांगणे आणि पटवून देणे हा होता. ताकात प्रोबायोटिक्स, जीवनसत्त्वे ( १२), कॅल्शियम आणि पोटॅशियम मुबलक असते, जे रोगप्रतिकारक शक्ती वाढवते, आम्लपित्त () कमी करते आणि वजन नियंत्रणात ठेवण्यास मदत करते.या मोहिमेचे अध्यक्षस्थान भूषवताना महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे यांनी ताक हे आरोग्यासाठी खूप लाभकारी आणि गुणकारी असून सर्वांनी रसायनयुक्त विदेशी पेय सोडून भारतीय पारंपरिक संस्कृतीतील ताक पिण्याची गरज आहे.ताक हे शरीरासाठी अत्यंत गुणकारी असून, पचन सुधारणे, उन्हाळ्यात ताक प्यायल्याने शरीरातील उष्णता कमी होऊन डिहायड्रेशनचा धोका टाळता येतो आणि शरीर थंड ठेवण्यासाठी उत्तम आहे, असे प्रतिपादन केले.त्याचबरोबर आयक्यूएसी समन्वयक डॉ.जमन अंगुलवार यांनी आपल्या भारतीय संस्कृतीमध्ये ताकाला पृथ्वीतलावरील अमृत असे संबोधन करून सर्वांनी ते रोज सेवन करण्याचे आवाहन केले.या मोहिमेत संगणकशास्त्र विभाग प्रमुख डॉ.रोहिणी शिंदे, इलेक्ट्रॉनिक्स विभाग प्रमुख डॉ. टी.एच.मुजावार यांनी देखील सहभाग नोंदवून मोहिमेस पाठींबा दिला

या मोहिमेच्या यशस्वीतेसाठी सूक्ष्मजीवशास्त्र विभाग प्रमुख डॉ. राहुल मोरे यांनी मार्गदर्शन केले तर या कार्यक्रमाचे आयोजन व प्रास्ताविक सूक्ष्मजीवशास्त्र पदव्युत्तर समन्वयक प्रा.शितल पाटील यांनी केले.सूत्रसंचालन वैभवी साखरे हिने केले तर आभार प्रदर्शन डॉ.महेश करळे यांनी केले.एम.एस्सी.प्रथम वर्षातील विद्यार्थीनी भक्ती शिंदे यांनी सूक्ष्मजीवशास्त्रीय दृष्टिकोनातून ताकाचे महत्त्व सर्वांना सांगितले.या मोहिमेच्या यशस्वीतेसाठी डॉ.डी.डी.ढेरे, प्रा.एस.एस.धुतेकर, प्रा.एस.बी.टेकाळे, प्रा.ए.आर.इंगळे, प्रा.आर.एस.मालू,इंगळे,माधव सूर्यवंशी,अशोक मदने,एम.एस्सी.प्रथम व द्वितीय वर्षातील विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.या मोहिमेची सुरुवात सर्वांना ताक पिण्यास देऊन करण्यात आली.

## टिकेकरवाडी येथे नवीन कोचिंग डेपोमुळे सोलापूर स्टेशनच्या पायाभूत सुविधांना मोठी चालना मिळणार

**सोलापूर/प्रतिनिधी :** मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागाने पहिल्या टप्प्याअंतर्गत टिकेकरवाडी येथे कोचिंग मेंटेनन्स डेपोला मंजुरी देऊन आपल्या पायाभूत सुविधा अधिक मजबूत करणे आणि कार्यान्वयन कार्यक्षमता वाढवणे सुरू ठेवले आहे. २०२५-२६ च्या अर्थसंकल्पात या प्रकल्पाला मंजुरी देण्यात आली आहे, जे या विभागातील क्षमता वाढीच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे.

टिकेकरवाडी स्टेशनवरील प्रस्तावित सुविधा सोलापूर विभागाच्या वाढत्या कोचिंग मेंटेनन्सच्या गरजा पूर्ण करण्यासाठी धोरणात्मकदृष्ट्या नियोजित आहे. सोलापूर स्टेशनपासून अंदाजे ७ किमी अंतरावर असलेल्या टिकेकरवाडी येथे रेल्वेची पुरेशी जमीन उपलब्ध आहे, ज्यामुळे मोठ्या प्रमाणावर पायाभूत सुविधांच्या विकासासाठी हे एक आदर्श ठिकाण ठरते. हे स्टेशन सोलापूर स्टेशनला पूरक असे एक विस्तारित कार्यान्वयन केंद्र म्हणून काम करण्यास सज्ज आहे.

प्रकल्पाची प्रमुख वैशिष्ट्ये (पहिला टप्पा):

- दोन नवीन वॉशिंग-कम-पिट लाईन्सचे बांधकाम (प्रत्येकी अंदाजे ७०० मीटर)
- दोन अतिरिक्त वॉशिंग-कम-पिट लाईन्सची तरतूद (प्रत्येकी ७५० मीटर, ६५०-मीटरच्या खड्ड्यांसह)
- कोच पार्किंग आणि देखभालीसाठी दोन स्टेबलिंग लाईन्सचा विकास (प्रत्येकी ७५० मीटर)
- अधिक लवचिकतेसाठी विद्यमान यूपी लूप लाइनचे यूपी आणि डीएन कॉमन लाईनमध्ये रूपांतर
- विद्यमान बॅलास्ट सायडिंगचे डीएन रिसेप्शन-कम-यूपी डिपार्चर लाईनमध्ये रूपांतर
- शेडसह टँडम व्हील लेथ लाईनची (१३०० मीटर) तरतूद
- एक समर्पित कोच स्टॉक लाईनची निर्मिती
- लोकोमोटिव्ह ऑपरेशन्सना सहाय्य करण्यासाठी लोको ट्रिप शेड लाईनची तरतूद

या सर्वसमावेशक पायाभूत सुविधांच्या सुधारणेमुळे विभागाची कार्यक्षम रेक देखभाल, गाड्यांची जलद फेरबदल आणि प्रवासी सेवांची सुधारित विश्वसनीयता यांसाठीची क्षमता लक्षणीयरीत्या वाढेल. टँडम व्हील लेथसारख्या आधुनिक देखभाल सुविधांच्या समावेशामुळे उच्च सुरक्षा मानके सुनिश्चित होतील आणि रोलिंग स्टॉकचा डाउनटाइम कमी होईल.

हा प्रकल्प भारतीय रेल्वेची आधुनिकीकरण, क्षमतावृद्धी आणि प्रवासी-केंद्रित सुधारणांप्रति असलेली निरंतर वचनबद्धता दर्शवतो. टिकेकरवाडी कोचिंग डेपो या परिसरातील रेल्वे वाहतुकीच्या भविष्यातील वाढीस पाठिंबा देण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावेल अशी अपेक्षा आहे. सोलापूर विभाग सुरक्षित, कार्यक्षम आणि उच्च-गुणवत्तेच्या रेल्वे सेवा प्रदान करण्यासाठी कटिबद्ध आहे.


प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले टिकाऊ रबरी शिक्के तयार करून मिळतील.

शाखा १. जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २. जडेऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# भाजपच्या 'स्थापना दिनानिमित्त संघटनशक्तीचा जोरदार शक्ति प्रदर्शन'; निलंग्यात भाजपचा जनाधार दृढ करण्याचा निर्धार

**निलंगा/आयुब बागवान :** भारतीय जनता पक्षाच्या स्थापना दिनानिमित्त निलंगा शहरात केवळ औपचारिक ध्वजवंदन न राहता संघटनशक्तीचे प्रभावी प्रदर्शन आणि आगामी राजकीय वाटचालीचा स्पष्ट संदेश देणारा कार्यक्रम पार पडला. शहरातील जनसेवा संपर्क कार्यालय परिसरात सोमवारी (दि. ६ एप्रिल) मोठ्या उत्साहात आणि कार्यकर्त्यांच्या प्रचंड उपस्थितीत हा सोहळा रंगला.

माजी मंत्री आमदार संभाजीराव पाटील निलंगेकर व युवानेते अरविंद पाटील निलंगेकर यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या कार्यक्रमात निलंगा नगरपालिकेचे नगराध्यक्ष संजयराज हलगरकर यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले. यावेळी उपस्थित कार्यकर्त्यांमध्ये विशेष उत्साह दिसून आला. यावेळी भारतीय जनता पार्टीचा विजय असो, नरेंद्र मोदी तुम आगे बढो हम तुम्हारे साथ हैं, अशा घोषणा देण्यात आले.

कार्यक्रमात केवळ स्थापना दिन साजरा करण्यापुरते मर्यादित न राहता पक्षाच्या विचारधारेची उजळणी करण्यात आली. 'राष्ट्र प्रथम, अंत्योदय आणि समर्पण' या तत्त्वांवर उभ्या असलेल्या भाजपने ४६ वर्षांचा प्रवास पूर्ण करत देशभरात मजबूत संघटन उभारले असल्याचे अधोरेखित करण्यात आले. तळागाळातील कार्यकर्त्यांच्या मेहनतीमुळेच पक्ष आज प्रत्येक गाव, शहर आणि समाजघटकांपर्यंत पोहोचला असल्याचा सूर उपस्थितांनी व्यक्त केला. यावेळी आगामी काळात जनतेशी अधिक संवाद साधून स्थानिक पातळीवर विकासकामांना गती देण्याचा निर्धारही व्यक्त करण्यात आला. विशेषतः युवक आणि नवमतदारांना पक्षाशी जोडण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यावर भर देण्यात येणार असल्याचे संकेत देण्यात आले.

कार्यक्रमाला भाजपचे तालुकाध्यक्ष कुमोद लोभे, वैभव पाटील केळगावकर, जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्य, नगरपरिषदेचे सर्व सभापती,



नगरसेवक, पदाधिकारी, विविध मंडळांचे अध्यक्ष, लोकप्रतिनिधी, पदाधिकारी तसेच मोठ्या संख्येने कार्यकर्ते आणि नागरिक उपस्थित होते.

या कार्यक्रमाच्या माध्यमातून निलंग्यात भाजपने आपली संघटनबांधणी अधिक मजबूत करण्याचा आणि आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर जनाधार वाढविण्याचा स्पष्ट संदेश दिल्याचे चित्र पाहायला मिळाले.

## अहमदपूर-चाकूरमधील ७ गावांतील बंधारे कामे अंतिम टप्प्यात

**लातूर/प्रतिनिधी :** शेतकऱ्यांच्या डोळ्यात पाणी नाही, तर शेतात पाणी असावे, या संकल्पासह सहकारमंत्री नामदार बाबासाहेब पाटील यांनी अहमदपूर-चाकूर मतदारसंघात सिंचन कामांचा धडाका लावला आहे. मन्याड नदीवर उभारण्यात येत असलेल्या कोल्हापुरी पद्धतीच्या बंधाऱ्यांमुळे या भागातील शेती आता नंदनवन होणार आहे. तालुक्यातील कोपरा, सोनखेड, माणखेड, विळेगाव, मावलगाव, चिलखा आणि शेणकुड या सात गावांच्या शिवारात बंधाऱ्यांची कामे सध्या युद्धपातळीवर सुरू आहेत. पावसाळ्यापूर्वी म्हणजेच पेरणीपर्यंत ही कामे पूर्ण करण्याचे निर्देश प्रशासनाला देण्यात आले आहेत. या प्रकल्पामुळे शेकडो हेक्टर जमीन ओलिताखाली येणार असून, शेतकऱ्यांना आता पारंपरिक पिकांऐवजी नगदी आणि बागायती पिके घेणे शक्य होईल. मन्याड खोऱ्यातील या विकासामुळे आर्थिक क्रांतीचे नवे दालन उघडणार आहे.

# ९.१८ लाखाचे मॉडीफाय सायलेन्सर, हॉर्न, टेप जप्त करून सार्वजनिकरित्या नाश

## ध्वनी प्रदूषणाविरुद्ध लातूर पोलिसांच्या वाहतूक शाखेची कारवाई

**लातूर/प्रतिनिधी :** नागरिकांच्या आरोग्य, शांतता व सार्वजनिक सुव्यवस्थेच्या दृष्टीने वाढत चाललेल्या ध्वनी प्रदूषणाच्या समस्येला आळा घालण्यासाठी पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांचे आदेशान्वये अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण व उपविभागीय पोलीस अधिकारी समीरसिंह साळवे यांचे मार्गदर्शनात वाहतूक नियंत्रण शाखेचे पोलीस निरीक्षक विठ्ठल दराडे यांचे नेतृत्वात वाहतूक नियंत्रण शाखेकडून मागील महिन्यात या विशेष राबविण्यात आली होती. मोहिमेमध्ये वाहनांवर बसविण्यात आलेल्या बेकायदेशीर व कर्णकर्कश ध्वनी निर्माण करणाऱ्या उपकरणांवर मोठ्या प्रमाणात कारवाई करत सदर उपकरणे जप्त करण्यात आलेले त्यामध्ये हॉर्न, फटाका सायलेन्सर, टेप, लेझर लाईट असे ०९ लाख १८ हजार रुपयाचे उपकरणाच्या समावेश होता.

वाहतूक नियंत्रण शाखा, लातूर यांनी शहरातील विविध प्रमुख मार्ग, चौक व संवेदनशील भागांमध्ये वाहनांची तपासणी करून नियमबाह्य उपकरणे शोधून त्यांच्यावर मोटार वाहन कायद्यानुसार कठोर कारवाई केली विशेषतः युवकांकडून वापरले जाणारे इंदुरी (फटाका) सायलेन्सर, मॉडिफाईड मफलर, उच्च क्षमतेचे साऊंड बॉक्स, कर्णकर्कश हार्न,



एलईडी लाईट्स व टेप रेकॉर्डर यांचा समावेश या कारवाईत करण्यात आला.

या मोहिमेत एकूण - १४९ बेकायदेशीर सायलेन्सर (अंदाजे किंमत ७,४५,०००/-),१९ साऊंड बॉक्स (अंदाजे किंमत १,५२,०००/-),०६ हार्न (अंदाजे किंमत ३,०००/-), २५ एलईडी लाईट्स (अंदाजे किंमत ५,०००/-), १३ टेप रेकॉर्डर (अंदाजे किंमत १३,०००/-), असा एकूण ९,१८,०००/- (नऊ लाख अठरा हजार रुपये) किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या सर्व प्रकरणांमध्ये संबंधित वाहनचालकांवर मोटार वाहन कायद्यानुसार गुन्हे नोंदवून दंडात्मक व कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे.

जप्त केलेले साहित्य भविष्यात पुन्हा वापरात येऊ नये, तसेच नागरिकांना होणारा त्रास कायमस्वरूपी थांबविण्यासाठी पोलीस प्रशासनाने त्याचा नाश करण्याचा निर्णय घेतला. ते आज दिनांक ०७ एप्रिल २०२६ रोजी सर्व जप्त साहित्य नवीन रेणापूर नाका ते रेल्वे स्टेशन रोड येथील एच.पी. पेट्रोल पंपासमोरील सिमेंट रोडवर पोलीस अधिकारी, कर्मचारी, महानगरपालिका कर्मचारी, पंच तसेच छायाचित्रकार यांच्या उपस्थितीत रोड रोलरच्या सहाय्याने सर्व साहित्य पूर्णतः निकामी करण्यात आले. ही प्रक्रिया संपूर्णपणे इन-कॅमेरा नोंदविण्यात आली. यानंतर निकामी करण्यात आले. सदर स्क्रॅप विक्रीतून १६,५६०/- इतकी रक्कम प्राप्त झाली असून ती शासनाकडे अधिकृत चलनाद्वारे जमा करण्यात येत आहे.

लातूर पोलीस प्रशासनाकडून नागरिकांना आवाहन करण्यात येते की, वाहनांवर बेकायदेशीर सायलेन्सर, कर्णकर्कश हार्न, साऊंड सिस्टीम किंवा इतर ध्वनी प्रदूषण करणारी उपकरणे बसवू नयेत. अशा प्रकारचे कृत्य हे केवळ कायद्याचे उल्लंघन नसून समाजाच्या आरोग्यास व शांततेस बाधा पोहोचवणारे आहे.भविष्यातही अशा प्रकारच्या ध्वनी प्रदूषणाविरोधात लातूर पोलीस दलाकडून सातत्याने व अधिक तीव्रतेने कारवाई केली जाणार असून, नागरिकांनी कायद्याचे पालन करून पोलीस प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

# मनपाकडून क्षयरोग रुग्णांना न्यूट्रिशनल सपोर्ट किटचे वाटप

## महानगरपालिकेतील अधिकारी व कर्मचारी यांनी योगदान दिले

**लातूर/प्रतिनिधी :** जागतिक आरोग्य दिनाचे औचित्य साधून आज दि ०७/०४/२०२६ रोजी महापौर जयश्रीताई सोनकांबळे मॅडम,आयुक्त मानसी मॅडम, सभागृह नेते विजयकुमार साबदे, स्थायी समिती सभापती,सचिन बंडापल्ले,विरोधीपक्ष नेते देविदास काळे,नगरसेवक फारुक शेख,उपायुक्त फड,वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ.शंकर भारती, वैद्यकीय अधिकारी डॉ.हर्षवर्धन राऊत (जिल्हा क्षयरोग अधिकारी कार्यालय) यांच्या उपस्थितीत १०० क्षयरुग्णांना फूड बास्केट देण्यात आले.

लातूर जिल्हा क्षयरोग मुक्त करण्यासाठी शासनाकडून औषधींचा मोफत पुरवठा करण्यात येतो.औषधे मिळत असली तरी रुग्ण पूर्णपणे बरा होण्यासाठी पोषण आहार आवश्यक असतो. या उपक्रमात लोकसहभागातून न्यूट्रिशनल सपोर्ट किट देता येते. या माध्यमातून निक्षय मित्र होता येते अशी माहिती डॉ.हर्षवर्धन राऊत यांनी दिली.

महापौर व आयुक्त यांनी लातूर शहरातील क्षयरोग रुग्णांना फूड



बास्केट वितरणासाठी विविध सेवाभावी संस्थांना आवाहन करण्यात आले. आजच्या दिवशी फूड बास्केट चे दाते म्हणून लातूर शहर महानगरपालिकेतील अधिकारी व कर्मचारी यांनी योगदान दिले.

तसेच आगामी काळात उपस्थित सर्व पदाधिकारी यांनी सदर मोहिमेचे कौतुक करत त्यांनी देखील या मोहिमेत सहभागी होण्याची सहमती तसेच अधिकाधिक स्वयंसेवी संस्थांना प्रेरित करण्याचे आश्वासन दिले.


टोनर रिफिलिंग
फक्त ₹ ३००/-
मास्टरप्लेट
ड्रेसिंग क्वालिटी
संपर्क
8600025070
9028376965
प्रिंटर्स पॅराडाईस
प्रिंटर रिपेअरिंग
कॉम्पॅटिबल कार्ट्रिजेस
टोनर रिफिलिंग


## युध्द विराम..

भडकणारं म्हणता
जाहीर युध्द विराम
सुटकेचा रे निश्वास
निर्णय रे अभिराम

घातल्या अटी शर्ती
दिसतो स्वल्पविराम
अंतस्थ ती मळमळ
शमला नाही संग्राम

अवघ्या जगता उगा
दरदरून फोडा घाम
विध्वंसवृत्ती दावली
पुरेसे झाले बा काम

विनाशकशक्ती दिसे
कृतीतून प्रवृत्ती वाम
नुकसानकेले सर्वांचे
काय मिळाले इनाम

दिसली क्रूरमनोवृत्ती
अडेल विचारात ठाम
जखम सळ सळणारं
कितीहीलावावा बाम

उशीरा ये शहाणपण
युध्दात न काही राम
पुनश्च ना उसळे युद्ध
करुनपुढीलं इंतजाम

काय मिळवले जाणा
वेठीला जग हे तमाम
काय गमावले जाणा
घालवूनबसा इतमाम

**– हेमंत मुसरीफ पुणे.**
९७३०३०६९९६

## एम. एस. बिडवे अभियांत्रिकी महाविद्यालयात राष्ट्रीय परिषदेचे आयोजन



**लातूर/प्रतिनिधी :** येथील एम. एस. बिडवे अभियांत्रिकी महाविद्यालयात फ्युचर ट्रेंड्स इन जनरेटिव्ह एआय : ऋगऋएछ--ख २०२६ या विषयावर दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या परिषदेसाठी की-नोट स्पीकर म्हणून कु.सोनाली पटवे ( ग्रुप प्रॉडक्ट मॅनेजर, टाटा डिजिटल, पुणे) तसेच प्रमुख पाहुणे म्हणून श्री मंथनजी त्रिवेदी ( सिनियर मॅनेजर, टाटा सन्स, मुंबई ) आणि श्री आकाशजी राठी (चेअरमन, लातूर अर्बन बँक )उपस्थित होते. या परिषदेत देशभरातून शोधनिबंध सादर करण्यासाठी संशोधकांनी सहभाग घेतला. या परिषदेचे मुख्य आकर्षण म्हणजे एम. एस. बिडवे अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी आर्टिफिसिअल इंटेलिगन्स या विषयावर शोधनिबंध सादर केले.

या परिषदेचे आयोजन डॉ. अस्मिता देशपांडे,डॉ. ओमप्रकाश शिवपुजे व डॉ. एन. एन. हलगरे यांनी केले.

परिषदेच्या यशस्वी आयोजनाबद्दल संस्थेचे अध्यक्ष श्री. आदिनाथ सांगवे, उपाध्यक्ष श्री. माधवराव पाटील चिंचोलीकर, सचिव श्री. माधवराव पाटील टाकळीकर, सहसचिव श्री. सुनील मिटकरी, कोषाध्यक्ष श्री. विजय रेवडकर, कार्यकारी संचालक श्री. प्रदीप दिंडेगावे, संचालक श्री. राजेश्वर बुके, श्री. बसवराज येरटे, श्री. काशिनाथ साखरे, सौ. ललिता ताई पांढरे, श्री. महेश हलगे, श्री. बाबुराव तरगुडे व श्री. गुरुलिंग धाराशिवे यांनी संबंधित प्राध्यापकांचे मनःपूर्वक अभिनंदन केले.

याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शेखर जगदे, उपप्राचार्य वीरभद्र बाळे हेही उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संबंधित प्राध्यापकांनी केलेल्या अथक परिश्रमाबद्दल त्यांचे अभिनंदन करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.


**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**अभियांत्रिकी कामे**

विभागीय रेल्वे व्यवस्थापक (कामे), मध्य रेल्वे, सोलापूर आणि मा.भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने, खालील कामांसाठी प्रतिष्ठित संस्था/कंत्राटदारांकडून ई-निविदा आमंत्रित करत आहेत. **निविदा सूचना क्र.: 05-2026-SrDENC, दिनांक:** ०६.०४.२०२६. **कामाचे नाव:** ADEN/KWV(BG) उपविभागांतर्गत SSE/Pway/Jeur यांच्या अखत्यारीतील विविध 'P.way' (मार्ग) कामे; कालावधी: दोन वर्षे. **कामाचा अंदाजित खर्च:** ४,१७,७२,६९६.७६. **अनामत रक्कम:** ८,३५,५००/-. **काम पूर्ण करण्याचा कालावधी:** २४ महिने. **देखभाल कालावधी:** लागू नाही **www.ireps.gov.in** या **संकेतस्थळावर निविदा अपलोड करण्याची अंतिम तारीख व वेळ: २०.०४.२०२६ रोजी १५:०० वाजेपर्यंत.** www.ireps.gov.in या **संकेतस्थळावर निविदा उघडण्याची तारीख व वेळ: २०.०४.२०२६ रोजी १५:३० वाजता.** इच्छुक निविदाकारांना असा सल्ला दिला जातो की, या निविदेसंदर्भात जारी केलेले कोणतेही बदल/शुद्धिपत्रके जाणून घेण्यासाठी, निविदा बंद होण्याच्या तारखेपूर्वी त्यांनी संकेतस्थळाला वारंवार भेट द्यावी. संकेतस्थळ: **www.ireps.gov.in**

**विभागीय रेल्वे व्यवस्थापक (कामे), मध्य रेल्वे, सोलापूर**
AK/Sur-16
तुमच्या जनावरांना रेल्वे रुळांपासून दूर ठेवा



**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**सिग्नलिंग कामे**

डीआरएम (एस अ‍ॅन्ड टी) कार्यालय, मध्य रेल्वे, सोलापूर आणि मा. भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि त्यांच्यासाठी, सक्षम व प्रतिष्ठित संस्था/कंत्राटदारांकडून खालील कामांसाठी रेल्वेच्या ई-खरेदी संकेतस्थळावर www.ireps.gov.in येथे ऑनलाईन ई-निविदा आमंत्रित करत आहेत:- **निविदा सूचना क्र.: SUR-N-T-2026-27-01, दिनांक:-** ०२.०४.२०२६. **कामाचे नाव व ठिकाण:** मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागातील ऊऊ-थऊ सेक्शनमधील विविध स्थानकांवर लूप लाईन्सचे कॉमन लूपमध्ये रूपांतर करणे. **कामाचा अंदाजित खर्च:** ९,५४,३९,०९१.६५. **निविदा अर्जाची किंमत:** शून्य. **जमा करावयाची अनामत रक्कम:** १९,०८,८००/-. **काम पूर्ण करण्याचा कालावधी:** १२ महिने. **निविदा बंद होण्याची तारीख व वेळ:** २४.०४.२०२६ रोजी १५:३० वाजल्यानंतर. कामाचा सविस्तर तपशील ireps संकेतस्थळावर उपलब्ध आहे. कोणतीही शुद्धीपत्रके/दुरुस्त्या असल्यास, त्या केवळ वरील ई-खरेदी संकेतस्थळावरच अपलोड केल्या जातील. केवळ ऑनलाईन निविदाच स्वीकारल्या जातील. प्रत्यक्ष/टपालाद्वारे/ई-मेल, फॅक्स किंवा हाताने सादर केलेल्या निविदा स्वीकारल्या जाणार नाहीत. निविदाकारांना विनंती करण्यात येते की, त्यांनी कंपनीच्या नावाने वर्ग-३ डिजिटल स्वाक्षरी प्रमाणपत्र प्राप्त करावे आणि त्याची नोंदणी **www.ireps.gov.in** या संकेतस्थळावर करावी. अनामत रक्कम (EMD) भरण्यासाठी नेट बँकिंग, पेमेंट गेटवे किंवा बँक गॅरंटी या माध्यमांचा स्वीकार केला जाईल; तसेच, मूळ बँक गॅरंटी निविदा सादर करण्याची अंतिम तारीख संपण्यापूर्वी (म्हणजेच, निविदा सादर करण्याच्या शेवटच्या दिवसाचा अपवाद वगळून), निविदा दस्तऐवजात नमूद केलेल्या अधिकृत अधिकाऱ्याकडे प्रत्यक्ष जाऊन जमा करणे आवश्यक आहे. अधिक तपशीलांसाठी कृपया **www.ireps.gov.in** या संकेतस्थळाला भेट द्या.

**विभागीय रेल्वे व्यवस्थापक (एस अ‍ॅन्ड टी शाखा), मध्य रेल्वे, सोलापूर**
AK/Sur-17
तुमच्या जनावरांना रेल्वे रुळांपासून दूर ठेवा



MAHAVITARAN
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

**E-TENDER NOTICE**

The Superintending Engineer, MSEDCL, Latur Circle on the behalf of MSEDCL (The Employer) invites sealed E-tenders from reputed and E-registered agencies/Bidder. The details are as given below:

| SR. No. | Tender No. | Particulars of work | Tender Purchasing Cost in Rs | EMD in Rs. |
|---|---|---|---|---|
| 01 | SE/LTR/TS/RMAB/T-10/2026-27 | Work Contract for Repairing and Maintenance work of 11 KV AB Switches & DO fuses at site and allied works by providing & fixing required material/spares in Latur, Nilanga and Udgir Division of Latur Circle. | 5000 + 18% GST = 5900/- | 50,000/- |

The tender will be processed in Electronic tendering Mode and opened for registered agencies on E-tendering system for works contracts of MSEDCL. The Bid document is available from 08.04.2026 to 13.04.2026. The last date of updating of E-tendering is 13.04.2026 up to 17.30 HRS. Pre bid meeting will be held on date 09.04.2026 at 11.00 HRS. for more regarding registration process and tender, visit our company's E-tendering website https://www.mahadiscom.in. The undersigned reserves all right to accept or reject any or all tenders without assigning reason thereof. **Contact Details** Ganesh Pachpohe, Executive Engineer (Admin) Contact No. 7875762010.

**PRO No. 051 Dt. 06/04/2026** — **Superintending Engineer, MSEDCL Latur Circle**



निलंगा शहरातील
एलआयसी
विमा भरण्याचे केंद्र
सितारी विमा सेवा केंद्र
दु.नं.२३, इदगाह कॉम्प्लेक्स,
जनता दवाखान्यासमोर
शिवाजी चौक, निलंगा.
वेळ सकाळी ९ ते सायं. ९ पर्यंत
जमीरोद्दीन सितारी
चेअरमन क्लक मेंबर CLIA
एजंट भरती चालू आहे.
संपर्क → Off: (02384) 242224, 9422612239, 9422658396



Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.
Editor: Dayanand Shankar Jade Mo. 9422472502, RNI 47034/64, POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26
हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे. मुख्यसंपादकः दयानंद शंकर जडे मो. ९४२२४७२५०२ आरएनआय ४७०३४/६४, पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी-५२/२४-२६